कादंबरी
नाटक

श्रीमान होळकर सरकार यांनीं
या नाटकास फक्त २५ रुपये
बक्षीस दिले. कारण हें संगीत नाटक
नाहीं.

कादंबरी नाटक.

स्फुरत्कलालाप विलास कोमला ।
करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ॥
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता ।
कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥१॥

बाण.

हें नाटक

विठ्ठल भगवंत लेंभे

सुंदरी, मित्रदर्शन, सुरतरंगिणी यांचे कर्ते यानीं रचिलें.

तें

(महाराष्ट्र कोकिल मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालें.)

सातारा "शुभसूचक" छापखान्यांत छापिलें.

सन १८९५ इसवी.

विठ्ठल भगवंत लेंभे

कादंबरी नाटक.

नान्दी.

पद.–(जल भरन जात०)

हे श्रीशंकर, हे गिरिजावर, मुनिजन सुखकर, हे करुणाकर ॥ धृ० ॥
तव चरणाचा अगाध महिमा, गाऊं न शके, हा तव किंकर ॥ हे०॥
अभिनव सुंदर जग हें जरि तरि तव पदरज हें अखिल चराचर ॥हे०॥
तव लीला ही, सकल कृपा तव, पर परमेश्वर तूंचि उमावर ॥ हे० ॥
ऐशा मंगल चरणां वंदुनि ध्यातो कवि तव रूप मनोहर ॥ हे० ॥

पद.–(विठाई माउली०)

बाणकवीश्वर मनीं ॥ स्मरुनि मीं होइन धन्यचि जनीं ॥ धृ० ॥
मंगल चरणारविंद सुखकर मजला तें निशिदिनीं ॥ स्म० ॥
रम्य मनोहर गिरा जयाची मधुरा अमृताहुनी ॥ स्म० ॥
अभिनव कादंबरी रंजवी रसिकां जी त्रिभुवनीं ॥ स्म० ॥
साहस करि हा कसा? मंदमति! तद्रूपक दावुनी ॥ स्म० ॥

पद.–(साध्य नसे मुनि कन्या०)

प्रेमळ दृष्टि शिवाची ॥ तुह्मां ती होवो सुखकर साची ॥ प्रेम० ॥
अभिनव सुंदर तनु ती पाहे ॥ गिरिजा विनयें अर्पित आहे ॥
माला स्वप्रणयाची ॥ झाली तल्लीन वृत्ति मनाची ॥ प्रेम० ॥
प्रेमरसाचा ओघ न माये ॥ परमानंदें भरलीं हृदयें ॥
धन्या गिरिजा साची ॥ होय शिवा जी खाणी सुखाची ॥ प्रेमळ०॥

सूत्रधार– प्रिये, बाहेर ये बरें!

नटी– ही मी आलें; काय आज्ञा आहे?

सू०– ही पहा, राजाधिराज शिवराज महाराज होळकर सरकार यांची सभा! महाराजांचा केवढा थोरपणा!

अंक पहिला.

(चंद्रापीड वैशंपायनासह येतो.)

चंद्रापीड.– मित्रा वैशंपायना, अरे तें किन्नराचें जोडपें हेमकूट पर्वताच्या आरामांतर्भागीं गुप्त झालें! काय तो विचित्र देखावा!

श्लोक.

केलें गायन किन्नरें मधुरसें स्त्रीच्या मनोरंजनी ॥
झालें स्तब्ध समस्त रम्य वन हें बा चित्रसें तत्क्षणीं ॥
लोला होउनि किन्नरी अरुणता येई कपोलावरी ॥
वाटे कौतुक, घर्मबिंदु बघुनी वक्षी सुमुक्तापरी ॥

त्यानें आपल्या प्रियेस असें विनविलें कीं,–

साकी.

रम्य वनांतिल लतागृहीं ही कोमल नव कुसुमांची ॥
शय्या पाहे क्रीडास्थानें असती विलासिनींचीं ॥
योग्यचि हीं तूतें ॥ कोमल दयिते क्रीडेतें ॥

वैशंपायन.–राजकुमारा आज हा अपूर्व चमत्कार आपण पाहिला! चला तर या वनांत त्यांचा शोध करूं! (आसपास पाहून) अहाहा! काय विलक्षण निर्जन वन प्रदेश हा!

साकी.

वृक्षलता जड चंड शिलांनीं व्याप्त महावन सारें ॥
जिकडे तिकडे घोर भयंकर कडे दरे बघ बारे ॥
मित्रा वनराजी ॥ दूरवरी तूं बघ आजी ॥

चं०– होय! आणखी पहा चमत्कार!

श्लोक.

कुठें झाडी आहे निबिड तरुंची गार हिरवी ॥
कुठें भूच्या पृष्ठीं पडुनि गिरि हा गर्व मिरवी ॥
नदीच्याजें जाणों गिरिवर पहा पाय पसरी ॥
गिळाया ब्रह्मांडें गुरुतर गुहा आचि पसरी ॥

वै०— होय, त्याचप्रमाणें ही रम्य अशोकराजीही रमणीय आहे!
चं०— येथून हा जलाशयाकडे मार्ग गेला असावा.
वै०— कशावरून?
चं०— हें पहा—

अंजनी गीत.

वनगज गेले क्रीडा करुनी ॥ तत्पदघातें तृण हें दबुनी ॥
कर्दम गळला चरणांमधुनी ॥ त्यांच्या या मार्गें ॥
गजशुंडाग्रामधुनी पडले ॥ पल्लव, तैशीं कोमल कमलें ॥
दर्भांकुरही अझुनी ओले ॥ असती या मार्गीं ॥

वै०— होय. हा अच्छोद सरोवराचा मार्ग. हा प्रदेश दर्शनीय आहे.
चं०— तर मग तो पाहिलाच पाहिजे.
वै०— चला तर.
चं०—हें पहा अत्यंत मनोहर अच्छोद सरोवर! किती स्वच्छ सरोवर हें!

श्लोक

विस्तीर्ण रत्नमय दर्पण हें जगाचे ॥
किंवा असे स्फटिक-मंदिर इंदिरेचें ॥
कीं चंद्रिका रसमयी अवतीर्ण झाली ॥
पुण्येंचि कीं सकल येथ जमोनि आलीं ॥

आणखी—

पद.— (उद्धवा शांतवन)

शोभा ही अभिनव ऐशी ॥ आनंदचि दे हृदयासीं ॥
मुक्ताफल-किरण समूहें ॥ जणुं हें सर भरलें आहे ॥
अति सुंदर हंस श्रेणी ॥ यामाजी विलसत आहे ॥
उत्फुल्ल चित्र कमलांच्या ॥ मकरंदीं लुब्धचि पाहे ॥
गुंजारव भृंग-ततीही ॥ आनंदें करिते पाही ॥
आनंदचि जलकणिकांहीं ॥ देतो हा वायु जनासीं ॥शोभाही० १
अमृतप्रद जल तें येथें ॥ नंदनवन तेंही येथें ॥
विश्रांतिस्थल देवांचें ॥ स्वर्गचि हें गमतें मातें ॥

रम्य स्थल न उरे कोठें ॥ सीमाचि होय हो येथें ॥
सारचि हें सौंदर्याचें ॥ स्थानचि हें प्रेमरसाचें ॥
गेहचि हें आनंदाचें ॥ मूळचि हें सर्व जगासीं ॥ शोभाही० ॥२॥

वै०–सृष्टींतील दर्शनीय वस्तूंचें जें सार तें हेंच होय!

चं०– मित्रा, ह्या सरोवरानें तर माझ्यावर अमृत वृष्टीच केली!

श्लोक.

नेत्रें आजि पवित्र निर्मल जलें आल्हाद हीं पावलीं ॥
गात्रें शीतल तोयबिंदुनिकर स्पर्शेंचि हीं तर्पिलीं ॥
कर्णांतें कलहंसशब्द सुख दे घ्राणेन्द्रिया पद्मिनी ॥
प्याया हें अति गोड गोड जल हो आनंद वाटे मनीं ॥

वै०– तुझ्यासारख्या रसिकास हें स्थल कसें आनंद देणार नाहीं?

(पडद्यांत गायन चालतें)

चं०– मित्रा! अरे ही अप्सरा गात आहे!

(पुनः पडद्यांत गायन चालतें.)

पद.–(जल भरन जात०)

हे शिव शंकर, चंद्र खंडधर, हे परमेश्वर, करित्यें वंदन ॥ धृ० ॥
तूं भवभंजन, तूं अघनाशन, तूंचि दयाघन, तूं मम जीवन ॥ हे० ॥
तूंचि सुमंगल, तूं अति कोमल, परमविमल तव सुखकर दर्शन ॥हे०॥
हे मुनिमानसहंस कृपाकरि, देवो मोदा तव गुण कीर्तन ॥ हे० ॥

वै०– राजकुमारा! काय मनोहर हें स्वरूप!

दिंडी.

अहा! आधीं गौरांग शोभताहे ॥
सितें वस्त्रें जाहलें रम्य पाहे ॥
गळां माळा शोभते मौक्तिकांची ॥
गमे विमला मज मूर्ति ही यशाची ॥

आणखी–

दिंडी.

जणों चंद्राची वंद्य असे देवी ॥

पुंडरीकाची प्राणसखी होई ॥
रम्य एकचि हें रूप जगीं गाजे ॥
महाश्वेता हें नाम हिला साजे ॥

चं०— सख्या, वैशंपायना मी येथें कांहीं काळ वनशोभा पहात बसतों, तूं आपल्या सेनाशिबिरांत जाऊन व्यवस्था करावी, ही पत्रलेखा मात्र माझ्या बरोबर असूंदे.

वै०— जशी राजकुमाराची आज्ञा (जातो.)

चं०— अरेरे! ही कन्या व्याकुळ झाली!

(मूर्च्छिता महाश्वेता येते.)

चं०— अरे ही तर मुर्छित झाली! (वारा घालतो.)

महाश्वेता.— (सावध होऊन) कोण आपण अकारण बांधव!

चं०— हे सुंदरी.

श्लोक.

आदर्श जो सकल शास्त्र कलादिकांचा ॥
किंवा असे उगम काव्यसुधारसाचा ॥
कीं होय रम्य कुल पर्वत सद्गुणांचा ॥
उत्पातकेतु अथवा अरिच्या कुलाचा ॥

असा सकल भुवनाधिपति दयार्णव!

साकी.

साहसकर्मीं आग्रेसर जो वीरश्रीचा नाथ ॥
शरणागत जे अभय तयांतें देउनि सुखदे नित्य ॥
ज्याच्या शरघातें ॥ शोक होय अरियुवतींतें ॥

आणखी—

साकी.

अरितें जाळुनि तद्रमणीच्या हृदयांतिल नाथातें ॥
जाळायास्तव धगधग ज्याची वरिवरि ये उदयातें ॥
प्रतापवन्हि असा ॥ ज्याचा प्रज्वलिताचि साचा ॥

असा भारतवर्षाधिपति महाराजाधिराज तारापीड त्याचा पुत्र मी दिग्विजयाच्या संबंधानें आलों आहें! मला चंद्रापीड ह्मणतात.

साकी.

कालगतीनें तव शोकानल अल्पहि शमला होता ॥
दुर्दैवानें बळें अहागे पेटविला तो आतां ॥
मन हें तळमळतें ॥ देखुनि तुझिया दुःखातें ॥

देवी, शांतहो! शांतहो!

दिंडी.

हृदय शोकें तव हाय उलत आहे ॥
रुचिर नेत्रांतुनि अश्रु पूर वाहे ॥
विकल गात्रें होवोनि कंप घेती ॥
म्लान झाला मुखचंद्र दिव्य कांति ॥

तुझी हृदयद्रावक मूर्ति पाषाणासही द्रव आणील मग तिच्या योगानें माझ्या हृदयास स्नेहरसाचे पाझर फुटले यांत काय नवल आहे!

महाश्वेता.—महाराज!

अंजनी गीत.

स्नेहरसाचा करीं ये प्याला ॥ दैवें परि तो हिरुनी नेला ॥
दुर्धर शोकानल हृदयाला ॥ वरि वरि हा जाळी ॥
दुस्तर सिंधुसिं तरुनी आल्यें ॥ अल्पजलांतचि हाय! बुडाल्यें ॥
जीवन माझें हरहर! नेलें ॥ हरूनी काळानें ॥

चंद्रापीड—
धैर्य तुला जों देऊं बघतों ॥ तोंतों कंठचि दाटुनि येतो ॥
निष्ठुर हा जन तुज विनवीतो ॥ शांति धरी बाई ॥

महा॰— हे पुण्य पुरुषा, पाषाण हृदयाची जी मी, तिला या शोकावेगानें काय व्हावयाचें आहे? हे महाभागा —

साकी.

घोर भयंकर अशी निशा ती साह्य जयातें झाली ॥
वज्र-हृदय तें कैचें उलते शोकानें या कालीं ॥
हरहर मरणाची ॥ वार्ता येथें हो कैची ॥

चं॰— अरे! हा कोण येत आहे?

महा०—माझी प्रियसखी गंधर्वराजकन्या कादंबरी हिचा हा सेवक केयूरक.

के०—भगवतीचा जय असो.

महा०—सखी कादंबरी कुशल आहेना?

के०—भगवतीच्या कृपेनें कुशल आहे. राजकन्ये! देवीनें प्रणाम सांगून विनंति केली आहे कीं –

साकी.

झाले बहु दिन, दर्शन घ्याया, उत्कंठित मन झालें ॥
कंठालिंगन केव्हां देइन ऐसें चित्तीं आलें ॥
आतुर हृदयाचें कौतुक पुरवी तूं साचें ॥

महा०—राजकुमारा! आपण हेमकूट पर्वत पाहिला नसेल, तेथें चित्ररथ गंधर्वाची राजधानी आहे! गंधर्व आणि किंपुरुष ह्यांचा सुंदर लोक तेथेंच आहे. आणि—

श्लोक.

आहे तेथ सुमंगला प्रियतमा कादंबरी मैत्रिणी ॥
लावण्याम्बुधिची सुरम्य लहरी जी सद्गुणांची खनी ॥
सौजन्यें, विनयें, प्रसन्न हृदया आनंद दात्री खरी ॥
जीची कोमल मंजु मंजु सुखवी कर्णेन्द्रियां वैखरी ॥

आणखी— हें स्थान

श्लोक.

आहे निधान जणुं तें रमणीयतेचें ॥
कीं होय रम्य पुर, नाकचि या जगाचें ॥
क्रीडास्थळें, उपवनें, रमणीय गेहें ॥
आनंद नित्य नगरांत भरोनि राहे ॥
शोभा अपूर्व अति सुंदर नंदनाची— ॥
गेहें, लतामय अशीं, पुरसुंदरींची ॥
जेथें सुवर्ण पुलिनांत मरालमाला— ॥
शोभे, असें नव सरस्तट दे सुखाला ॥

असा अपूर्व प्रदेश पाहण्याचें कौतुक असेल, व माझी प्रार्थना निष्फळ करणें नसेल तर मजसहवर्तमान चलावें.

साकी.

कारण नसतां बंधुत्वें मम चित्त प्रसन्न केलें ॥
ऐशा सत्पुरुषाचें दर्शन दैवें मजला घडलें ॥
दुःखें तीं हलकीं ॥ करिनाचि कथुनी सुजना कीं ॥

चं०—हा माझ्यावर भगवतीचा मोठाच अनुग्रह झाला! सख्या केयूरका हाचना तो हेमकूट पर्वत?

के०—होय. हा पहा अत्यंत रम्य हेमकूट पर्वत. याच्याच पलीकडे ही आपली गंधर्वपुरी ज्या ठिकाणीं जागजागीं कल्पवृक्षांची सुरम्य रचना आल्हाद देत आहे, त्यामधून गिरिराजाचीं सुवर्ण शिखरें झळकत आहेत, तसेंच सुरम्य पर्वताली वरून शुद्ध धवल निर्झराचे ओघ धो धो वहात आहेत व जेथें सुवर्ण गोपुरांवर विचित्र ध्वजा तोरणें फडकत आहेत तो सर्व प्रदेश आपल्या गंधर्वपुरीचाच आहे. तशीच ही सुरम्य वनराजी, हा उपवनांतील क्रीडा पर्वत, व त्यांतच हें सुंदर नवरत्नजडित भव्य मंदिर. या ठिकाणींच कोमलतनु चंद्रमुखी नवयौवना सुंदरी आपल्या परिजन मंडळांत विराजत आहे. अहाहा! हा पहा मधुर संगीतध्वनि तिकडूनच येत आहे, त्यानें या कर्णरंध्राचें तर्पण केलें! त्याच मंजुळ ध्वनींत मंगल जयशब्द मिळून प्रसन्नमनास आल्हाद होत आहे! असें हें रमणीय क्रीडाभुवन देवी तुझ्या खिन्न चित्तास आल्हाद देवो.

म०—हे भाग्यवंता राजपुत्रा! अत्यंत रमणीय अशा ज्या परिचारिका, त्यांच्या मंडळांत सुंदर "श्रीमंडपा" च्या मध्यभागीं देवी कादंबरी शोभत आहे ती पहा!

श्लोक.

जीच्या—प्रफुल्ल नलिनी असती—सभोंतीं ॥
ती इंदिराचि विलसे अति दिव्य कांति ॥
किंवा अनंत अति सुंदर तारकांची ॥
शोभाचि ही शशिकला जणुं होय साची ॥

(कादंबरी मदलेखेसह येते)

चं०—अहाहा! धन्य ही गंधर्वकन्या!

साकी.

अभिनव, कोमल, निर्मळ, सोज्वळ मुखचंद्रचि हा आहे ॥
मनःपयोनिधि खवळुनि गेला परमोल्हासें पाहे ॥
सारीं मम गात्रें ॥ झालीं न च कांहो नेत्रें ॥

दिंडी.

सकल सुंदर वस्तुचें सार येथें ॥
वसे; सोज्वळ नवरत्नकांति जेथें ॥
रुचिर कोमल रमणीय अशा देहीं ॥
उणें कोठें तिळएक नसे पाही ॥

मदलेखा—(एकीकडे) देवी महाश्वेते, तुमच्या सखीची व या राजकुमाराची दृष्टादृष्ट होतांच काय चमत्कार झाला पहा!

श्लोक.

होतीं निश्चल जीं सुरम्य नयनें तीं जाहलीं चंचलें ॥
झालें प्रेमळ चित्त लोल, तनु तें रोमांच हे शोभले ॥
कांपे अंग, जधीं उठोनि विनयें पाहे तया सुंदरी ॥
लज्जा आजि जणों नवीच शिरली प्रेमोद्भवें अंतरीं ॥

कादंबरी—(पुढें होऊन महाश्वेतेस आलिंगिते)

महा०—सखे कुशल आहेसना?

का०—(गहिंवरानें)— **दिंडी.**

दुःख मार्गे आपुलें सारियेलें ॥
कुशल माझें तूं पुसशि दयाशीले ॥
अहा निर्दय मी पहा किती आहें ॥
तुझ्या दुःखें नच हृदय उले गे हें ॥

महा०—सखे, महा दुर्दैवी अशी जी मी तिला आपल्या पापाचें फळ भोगिलेंच पाहिजे. परंतु या महापुरुषाच्या सौजन्यानें माझ्या दुःखित मनास आल्हाद दिला. आपल्या प्रेमळ स्वभावानें ह्यानें माझें मन आक-

र्षित केलें, असा हा महा पराक्रमी, दयार्णव राजपुत्र दिग्विजयाच्या संबंधानें इकडे आला आहे!

पद. (श्रीहरिच्या वेणुनादें)

हें नेत्रानंदकारी रत्नाचिगे वत्सले ॥
अभिनव हें रूप देवें कौशल्यें निर्मिलें ॥
लक्ष्मीला योग्य ऐसें स्थळ दैवें लाधलें ॥
श्रेष्ठत्वें देवलोका या आर्यें जिंकिलें ॥

याचा थोरपणा वर्णावा तितका थोडाच!

श्लोक.

चित्तीं धर्म वसे तसाच यम तो कोपांत याच्या वसे ॥
वाणीमाजि सरस्वती तशिच ती दृष्टींत लक्ष्मी असे ॥
धीच्याठायिं बृहस्पती मदन तो रूपांत! तेजीं रवि! ॥
घेई वैश्रवणत्व दातृसमयीं याची अशी थोरवी ॥

इतकें असून

साकी.

सौजन्यें निज विनयें तैसा शीतल चंद्रचि आहे ॥
अगाध ऐशा दयार्णवाचा पार न लागे पाहे ॥
निधि हा स्नेहाचा ॥ दैवें सांपडला साचा ॥

अशा अनर्घ्य रत्नाचें दर्शन तुलाही व्हावें ह्मणून म्यां ह्यास येथें आणिलें आहे. तर

साकी.

निर्मळ चित्तें निर्भय होउनि लेखुनि मजसम यातें ॥
स्वागत देण्या सिद्ध होय तूं सोडुनि संकोचातें ॥
दर्शन गे याचें ॥ मंगलकारक हें साचें ॥

हा राजपुत्र

श्लोक.

कौशल्य सर्व भुवनांतिल खर्चियेलें ॥
कामें असें रुचिर सुंदर रूप केलें ॥

गे चंद्रमा, कमल, मन्मथ, दर्शनीय ॥
याच्या नखासहि सखे तुळितील काय? ॥

कादं०—(प्रणाम करते)

चं०—पुरे पुरे इतका विनय कशाला?

महा०—राजपुत्रा,

श्लोक

लज्जावती विनय एकचि मात्र जाणें ॥
ग्राम्यस्त्रिये परिस भीरुचि होय जाणे ॥
केला प्रणाम तुजला विनयें सखीनें ॥
वाटे मला परम कौतुक बा तयानें ॥

चं०—महाश्वेतेचीच सखी! मग विनयसंपन्न कशी नसेल?

महा०—सखी कादंबरी, इकडील वर्तमान काय आहे?

मदलेखा— तुमचा परिहासशुक ह्याचें दर्शन झाल्या पासून आमची मदनसारिका फार व्याकुळ झाली आहे.

महा०—योग्यच झालें तें.

मद०—तिची विरह व्यथा आमच्यानें पहावत नाहीं!

दिंडी

स्तब्ध झालें सर्वांग सारिकेचें ॥
बघे सस्पृह ती वदन त्या शुकाचें ॥
निराशेनें जाहलें चित्त खिन्न ॥
अश्रुधारा वाहती सतत जाण ॥

आणखी—

श्लोक

एकीकडे विनय सुंदरि लाज देई ॥
एकीकडे दयित-संगम लोभ येई ॥
वाटे प्रसन्न हृदयास विलास व्हावे ॥
वाटेचि धाक तिस तन्मन काय ठावें ॥

तर देवीनें आपल्या शुकास उपदेश करून या गोष्टीचा न्याय करावा.

महा०—न्याय करण्याचें काम राजपुत्राचें आहे.

चं०—देवी कादंबरी तूं आपल्या सारिकेस सांगकीं—

श्लोक

प्रेमें जरी नववधू अनुरक्त होती ॥
धाकें परंतु करिती अवधीरणा ती ॥
ऐशीं मनें परम चंचळ जीं वधूंचीं ॥
विश्वास तेथ न धरीलचि धी बुधाची ॥

ह्मणून परिहासशुकानें मदनसारिकेच्या हृदयाची परीक्षा पाहिल्याशिवाय अनुरक्त होऊं नये.

महा०—कादंबरी, यावर तुझ्या सारिकेचें काय ह्मणणें आहे तें सांग.

मद०—देवी कादंबरी विनविते कीं हें पक्षपाताचें भाषण आहे, आमची प्रेमळ सारिका एका प्रेमावांचून कांहीं जाणत नाहीं.

साकी

निज लावण्यें मधुरवचें ही लावुनि चटका चित्ता ॥
हरुनि तयातें हरहर आतां कैशी ही निष्ठुरता ॥
शोभे सुजनांतें ॥ जडलें सत्यचि तें नातें ॥

तर, देवी महाश्वेते, सारिका तुझी! शुकही तुझा! व ही आमची सखीही तुझीच आहे; तेव्हां तुला योग्य दिसेल तें कर ह्मणजे झालें.

महा०—आर्या चंद्रापीडा! सखीचा तर आग्रह पडला! आपला शुकही अनुरक्त आहे, तेव्हां तूंच सांग काय करावें तें.

चं०—आर्ये महाश्वेते— **श्लोक**

उदार बहु थोर हें हृदय, ज्यांत बिंबे दया ॥
ह्मणों परम नीच तो जगिं न मान दे जो तया ॥
अशा सुजनसंगमीं मदन-सारिका वाढली ॥
खरीच तुमच्या कृपें सतत धन्य ही जाहली ॥

तर असा प्रेमानुकूल प्रिय-संगम कोणास आवडणार नाहीं?

महा०— आज मी मदनसारिका व परिहास ह्यांच्या ऋणांतून मुक्त झाल्यें. आतां फक्त एक काळजी राहिली.

कादं०—ती कोणती?

महा०—सांगत्यें ऐक— **साकी**

देखुनि माझ्या दुर्दैवातें दुःख जयेतें झालें ॥
अशा सखीच्या सुखार्थ माझें हृदयचि हें कळवळलें ॥
चिंता ही माझी ॥ दूर करींगे तूं आजी ॥

कादं०—आर्ये महाश्वेते —

पद

हेतु न कळला मजला तुझिया ऐशा वचनाचा ॥
ऐशा निष्ठुर वचनें झाला भेदचि हृदयाचा ॥ धृ०॥
काय असे तुज करणें पारख माझ्या हृदयाची ॥
किंवा आहे निंदा करणें माझ्या प्रणयाची ॥
नको नको सुख जेथें सीमा तुझिया दुःखाची ॥
दुष्टा मदना मित्र ह्मणूं का? शत्रुचि तव साचा ॥ हेतु० ॥

महा०— (गहिंवरून कादंबरीच्या गळ्यांत मिठी मारते)

चं०—हरहर करुणरसास पुनः भरती आली!

मद०—देवी महाश्वेते, आर्ये कादंबरी, कृपाकरून शोक आवरावा! हायहाय! सुहृज्जनांचीं दुःखें वारंवार मनास खेद देतात.

चं०— **श्लोक**

चित्तद्रवे, भर असा करुणारसाचा ॥
आर्ये गमे हृदयभेद करील साचा ॥
बंधु स्वयें ह्मणवितों तुझिया सखीचा ॥
खिन्ना तुह्मां बघुनि दुःखित मीहि साचा ॥

मद०— देवी कादंबरी, तुझ्या मनाचें रंजन करावयास ही चतुर पत्रलेखा मी देतें हिचा स्वीकार कर.

महा०—आर्ये कादंबरी —

साकी

दयाघनें या विशुद्ध भावें अर्पियली ही दासी ॥
निष्कारण-सौजन्यें कितितरि आकर्षिल हृदयासीं ॥
चतुरे संकोचें वरिवरि तव मन कां कांचे ॥

मद०—आर्ये महाश्वेते माझी प्रियसखी ह्मणते कीं,—

पद. (श्रीरंग गोपिकोत्संग या चा०)

वंदिले, परम मंगलें, चरण चांगले शुद्ध भावानें ॥
जाहलें ऋणी सौजन्यभरें या जाणें ॥ धृ० ॥
हे सखि, रत्नपारखी, असशि तूं निकी, अशा रत्नाचें ॥
दर्शन घडलें तुझ्या कृपेनें साचें ॥
अंतरीं दया हे खरी धन्य चातुरी निधी सुगुणाचा ॥
अंत न लागे अगाध या हृदयाचा ॥
बांधवें तुझ्या, गौरवें प्रणय वैभवें दीन तव कन्या ॥
केली सौजन्येंचि आजि ही धन्या ॥
(चा०) दर्शनेंचि मन ही हरी चतुर सुंदरी ॥
दर्शनेंचि भरलें अहा! प्रेम अंतरीं ॥
वाटतें करिल ही इष्ट कार्य लौकरी ॥
(चा०) हें रमें, सुजन संगमें, चित्त मज गमें. देणगी ह्मणुनी ॥
मी घेत्यें या मंगल चरणा नमुनी ॥ वंदिलें०॥

चं०—आर्ये महाश्वेते,

दिंडी.

ब्रह्मदेवें कौशल्य खर्चुनीया ॥
रम्य तनु ही निर्मिली काय वाया ॥
रुचिर सुंदर यौवनें पंचबाणा ॥
काय नसतिल घातल्या बहुत आणा ॥
धन्य नकळे त्रिजगांत कोण आहे ॥
दैव ज्याचें उदयासि येउं पाहे ॥
रुचिर सुंदर पुष्पासि खुडुनि ऐशा ॥
काय चतुरे करिशील तूं निराशा ॥

महा०—आर्ये कादंबरि, खरेंच सांग बरें या राजपुत्राच्या गुणारूपास व वैभवास योग्य असें स्थळ कोणतें तें!

मद०—आर्ये या राजपुत्रास रहावयास हजारों स्त्रियांचीं हृदय-मंदिरें पुरीं होत नाहींत काय?

महा० – पण रूपाची निरुपमता, लक्ष्मीचें मनोहर निवासस्थल, पृथ्वीचा अभिलाष, स्त्रीजनाच्या नेत्रांचें कौतुक, व अकृत्रिम प्रेमाचा झरा ह्या सर्वांचा एकत्र समागम जाणण्याचें सामर्थ्य आमच्या चतुर सखीच्या प्रेमळ हृदयावांचून अन्य स्थळीं दिसेल काय? आर्ये कादंबरि, जिची चित्तवृत्ति विरक्त व उदास झालेली अशी जी तुझी सखी, तिचें ज्यानें आपल्या सरल स्वभावानें आकर्षण केलें अशा उदार पाहुण्याची अर्घ्यादि पूजा करणें उचित नव्हे काय?

चं० – (आपणाशीं)

अं० गीत.

प्रेमरसाचें वारें हृदयीं ॥ भरलें, उत्कंठा लवलाही – ॥
उपजे, तीसह आशा तीही ॥ या सद्रत्नाची ॥
परि ती आतां काय सखीतें ॥ उत्तर देते नकळे मातें ॥
ऐशा धाकें उर धडधडतें ॥ वरिवरि हें माझें ॥ १ ॥

मद० – आर्ये महाश्वेते, आमची सखी मुग्धस्वभाव व संकोच यांनीं खरोखर मूढ झाली आहे.

श्लोक.

हें भीरु मुग्ध हृदय स्वजनांसवेंही ॥
बोलावया वरिवरी धरि भीति पाही ॥
घेवोनियां स्वसखिची नवरत्न माला ॥
मी अर्पितें ह्मणुनि या विबुधोत्तमाला ॥ १

चं० – आर्ये महाश्वेते –

श्लोक.

अंगीं तो गुण लेशही न, परि या दासावरी ही कृपा! ॥
कैशी? शोधुनि पाहतों, परि मनीं आश्चर्य वाटे अहा! ॥
देवीचा सरल स्वभावचि तसें सौजन्य, दे हें फळ ॥
लोहातें परिस क्षणैक जडतां सोनें घडे निर्मळ ॥ १ ॥

(पडद्यांत) देव! उज्जयिनीहून महाराजांकडून मी कैवर्तक आलों-आहें (चाकर येतो).

चं० – कैवर्तका! तात तारापीड कुशल आहेत कीं?

कै०– होय. महाराजांची राजकुमारास अशी आज्ञा आहे कीं, तुमच्या विरहानें आमचीं मनें खिन्न झालीं आहेत, तर आम्हास सत्वर येऊन भेटावें.

चं०– आर्ये महाश्वेते! गुरुजनांची आज्ञा उल्लंघन करितां येत नाहीं!

कादं०–(आपणाशीं) हे कादंबरि तुझें प्रियजीवन निघून गेल्यावर तूं जगशील तरी कशी?

चं० –

साकी.

आज्ञा गुरुची बळेंचि ओढी मातें आज्ञा देई ॥
पुरे पुरे हा गहिंवर आतां आर्ये प्रसन्न होई ॥
आतां मी येतों ॥ पुनरपि तव पद हे बघतों ॥

महा० – सखे कादंबरी, प्रयाण समयीं मंगल करण्याकरितां आर्याबरोबर जाण्यास आज्ञा दे. (मदलेखा, पत्रलेखा व कादंबरी शिवाय सर्व जातात.)

कादं० – खरेंच कायगे तो राजकुमार निघून गेला!

मदलेखा० – होय देवी.

कादं० – हायहाय (मूर्च्छित होते.)

मद० – देवि! सावध हो! सावध हो!

का०– (सावध होऊन) (स्तब्ध बसते.)

पत्रलेखा –

पद (जन्मुनि रविवंशीं ऐसा)

दुर्धर विरहानल बाई ॥ व्याकुल झालिस तूं पाही ॥ ध्रु०॥
म्लानमुखि तूं बोलाया ॥ इच्छिशि, परि लाजसि वाया ॥
शोकावेग तुझ्या हृदया ॥ रोधुनि कांपवि अधराया ॥
वाहे अश्रु नदी बाई ॥ व्याकुळ झालिस तूं पाही ॥ दु०॥

देवि असें काय करतेस. ही मी आपल्या पदरानें तुझे अश्रु पुसून हें म्लान वदन स्वच्छ करित्यें.

का०– पत्रलेखे माझ्या सर्व परिजनांपेक्षां तूंच मला इतकी प्रिय का-

बरें वाटतेस? मला वाटतें तूं माझें विश्वासस्थान आहेस. तर मी आपला दुःखभार एकदांचा तुझ्यावर टाकून जीवितहीन होत्यें.

पत्र०— छे छे! देवि, असें करूं नको. तुझ्या विपरीत वर्तनें आमच्या राजपुत्राचे प्राण तरी कसे वांचतील?

कादं०— ज्या हृदयानें हा वृत्तांत जाणिला आहे, त्याची देखील मला लाज वाटते. छे छे! केवढी मी उद्धट! केवढी मी गर्विष्ट! केवढी हलकट!

श्लोक.

संकल्पें दिधलें न ज्या गुरुजनें चित्तीं तया चिंतुनी ॥
चांचल्यें विनया त्यजोनि ह्मणवूं मी निस्त्रपा या जनीं! ॥
ज्यातें सत्कुल शील रीति न कळे प्रत्यक्ष जें अंधळें ॥
त्या प्रेमा ममचित्त मित्र ह्मणवी कैसें न गे हें खुळें? ॥ १ ॥

तर मी प्राणत्याग करून आपला कलंक दूर करित्यें.

पत्र०— देवि कादंबरि, नको गे आपल्या जिवास कष्ट देऊं! देवीचें दग्ध हृदय पाहून माझ्या जिवाचें पाणी होतें. राजपुत्रानें तुझा असा कोणता अपराध केला आहे बरें? अथवा तुझ्या कोमल हृदयास कोणत्या अविनयानें दुखविलें?

का० — सांगत्यें ऐक.

अंजनी गीत.

स्वप्नीं गुज गोष्टी हा करितो ॥ जळीं स्थळीं स्मित करुनी बघतो ॥
वरि वरि लीला दावुनि हरितो ॥ तन्मय मन माझें ॥१॥
औत्सुक्यें मी बघत्यें जों तों ॥ दूरचि निघुनी पळुनी जातो ॥
विरहानल हा हृदयीं भरितो ॥ निर्दय गे ऐसा ॥२॥

(मूर्च्छित होते.)

पत्र० — देवि सावध हो! (वारा घालते.)

कादं० — (सावध होऊन) पत्रलेखे कशाला हे आयास करतेस?

दिंडी.

बाइ निंदा ऐकतां हा रुसोनी ॥

जाउं पाहे जो हृदय हें त्यजोनी ॥
तयें झाला घाबरा जीव सारा ॥
काय त्यातें हा करिल गार वारा ॥

पत्र० – देवि हे सर्व खेळ त्या दुष्ट व धूर्त अशा मदनाचे आहेत! देव चंद्रापीडाकडे काय दोष आहे?

श्लोक.

गे धर्मशील मन हें सरल स्वभावें ॥
त्यातें बये मदन कैतव काय ठावें? ॥
गे दर्शनेंचि अनुराग भरोनि राहे ॥
ऐशा उदार हृदयांत दयाचि आहे ॥१॥
आरक्त नेत्र तव देखुनि हे कृशांगि ॥
बाष्पें तशींच तुझिया नयनीं बघोनी ॥
आणी प्रयाणसमयीं नयनासिं पाणीं ॥
जो, तो कसा ह्मणशि निष्ठुररूप खाणि? ॥ २॥

कादं० – असा तो मदन आहे तरी कसा?

पत्र० –

श्लोक.

हा जात्या जरि अंगहीन, तरिगे अग्नि स्वयें हा असे ॥
जाळी तो हृदयासिं हा वरि वरी, ज्वाळा जरी या नसे ॥
नेत्रांपासुनि पाडितो जल, जरी निर्धूम हा सुंदरी ॥
रक्षाहीन, परंतु हा तनुकरी शोषोनिया पांढरी ॥ १ ॥

असा हा मदन पुष्पधन्वा असून त्रिभुवनास अजिंक्य आहे!

कादं० –

साकी.

अनंग जो हा सांग होउनी लावुनि चटका गेला! ॥
त्या तापाच्या योगें माझा देह व्याकुळ झाला ॥
हृदय न परि दिधलें ॥ उलटी मूढचि मी झाल्यें ॥

तूं माझें जीवित आहेस, तर तूंच मला सांग गुरुजनाच्या निंदेस पात्र अशी

जी मी तिला जीवापेक्षां मरणच प्रशस्त आहे कीं नाहीं!

पत्र० – पुरे पुरे देवि, मरणाविषयीं इतका आग्रह कशाला धरतेस?

कादं० – **श्लोक.**

स्वैरिणी न मी ठाउकें तुला। तात बंधुचा धाक गे मला ॥
अर्पिलें जया चित्त तो अहा!। गे करीं नसे मूढ मी पहा ॥१॥

पत्र० – देवि, **श्लोक.**

जेणें या तुझिया प्रसन्न हृदयीं प्रेमाङ्कुरां रोविलें ॥
रूपाला अनुरूप रम्य तनुतें दावोनियां मंगले ॥
संकल्पें निजकन्यका प्रियजना ही अर्पिली निस्तुला ॥
ऐसा हा तव काम बंधु न कसा गे सांग आतां मला ॥१॥

तर तूं मरणाविषयीं आतुर होऊं नको. तुझ्या दयितांचें औदार्य व सौजन्य यांवर माझा पूर्ण भरंवसा आहे, तर तूं त्यास घेऊन येण्याविषयीं मला आज्ञा कर.

कादं० – (सभय) नकोबाई! येवढें साहस करूं नको! ही माझी लज्जा, उद्विग्नता, जडता, हीं मला प्रियाजवळ उभी देखील राहूं देणार नाहींत. भयानें आतांच माझें सर्वांग कांपूं लागलें! त्यास इकडे आणून काय उपयोग होणार आहे! तीच मी कादंबरी आणि तोच ना कुमार!

पद (वैशाखमास वासंतिक)

प्रेमळ जरि सदय हृदय बाइ आसतें ॥
निष्ठुर होवोनि मला काय सोडितें ॥धृ ॥
उत्फुल्ल कमल गंध जयामाजि बिंबला ॥
आनंद मंद मंद पवन देउं लागला ॥
पुष्प वाटिकेंत सुखद गंध सूटला ॥
धारागृह तेंचि आजि हृदय जाळितें ॥ प्रेमळ० ॥१॥
असह्य बाइ अंगराग मजाशीं जाहला ॥
वरि वरि संताप देति इंदुच्या कला ॥
रमणीय शेज पुष्पमयी ताप दे मला ॥
निपट इंद्रजालचि तें होय भुलवितें ॥ प्रेमळ० ॥२॥

आतुर ते नयन हेचि अश्रु ढाळिती ॥
निराश तेंचि हृदय शून्य होय संप्रती ॥
तेंचि हें शरीर जया प्राण निंदिती ॥
अदय तोचि हा! वळेल काय गे तुतें ॥ प्रेमळ० ॥३॥

पत्र० — देवि, व्यर्थ खिन्न होऊं नको. ही पहा मी जाऊन त्यास घेऊन येत्यें. देवि, राजपुत्रास तुझा निरोप काय सांगू?

कादं० — पत्रलेखे! थोर पुरुषास निरोप पाठविण्याची मला लाज वाटते! शिवाय म्यां मूढेनें निरोप तरी काय पाठवावा? तूं मला प्रिय आहेस ह्मणूं? तर ही पुनरुक्ति होते. तूं माझा आत्मा आहेस ह्मटलें तर ही गोष्ट खोटी आहे. मी प्रणयाकुला ह्मणेन तर गळीं पडल्यासारखें होतें. तुझ्या वांचून मी जगणार नाहीं ह्मणेन, तर मूर्खत्व पदरीं येतें. मी कामदग्ध झालें, ह्मणेन तर धाष्टर्य पदरीं येतें. मदनानें मला तुझ्या पदरांत घातलें ह्मणावें तर कुटिल स्वभावाचा दोष येतो. बरें मी त्यास इकडे बोलाविलें तर ही गर्वोक्ति होते. तर सखि, आतां मी केवळ मूढ झाल्यें.

पत्र० — बरें तर देवि तूं स्वस्थ रहा.

साकी.

निज चातुर्यें हित मित कथुनी वळवुनि तव जीवातें ॥
झडकरि आर्ये घेउनि येत्यें, त्यज आतां चिंतेतें ॥
मंगल तव होवो ॥ दैव तुझें उदया येवो ॥

हें पहा देविः—

श्लोक.

अस्ताचला त्यजुनियां रविचक्र गेलें ॥
आरक्त गे क्षितिज हें रमणीय झालें ॥
गेला पुढेंचि तव जो अनुराग त्याचा ॥
दिव्य प्रकाश उरला गगनांत साचा ॥१॥

(पडदा हळू हळू पडतो.)

अंक दुसरा.

(चंद्रापीड वैशंपायनासह येतो.)

चंद्रापीड– मित्रा वैशंपायना! परत जावयाकरितां अच्छोद सरोवरापर्यंत आलों. आतां मला पुढें जाववत नाहीं. कारणः—

साकी.

जें मदनाचें विलासमंदिर सुंदर रूप सखीचें ॥
हृदयीं भरलें, तेंचि असे हो जीवन या जीवाचें ॥
हरहर म्यां ऐसें ॥ त्यजिलें रत्न अहा! कैसें ॥

वैशंपायन– मित्रा! आर्या कादंबरीचें दर्शन आपणास होईल. धैर्य सोडणें उचित नाहीं!

चं०– मित्रा कायरे करूं! त्या रूपसंपन्न युवतीचे प्रणयजाल अजून माझ्या जिवास ओढीत आहेत!

दिंडी.

प्रेमपाशें बांधिलें हृदय पाहे ॥
क्षीण माझें सर्वांग होत आहे ॥
होय माझी जड दृष्टि, शून्य सारें– ॥
गमे, भरलें विश्वांत तिचें वारें ॥

मित्रा, फार काय सांगूं! मला सर्व त्रिभुवन कादंबरीमय दिसतें!

वै०– होय! हा त्या सुंदरीच्या रूपाचा प्रभाव!

चं०– हे मनोहर रूपा! ब्रह्मदेवानें तुला अत्यंत रमणीय स्थळ देऊन धन्य केलें!

दिंडी.

कुरळ केशीं गुंतोनि राहिलासी ॥
फुल्ल नयनांतुनि बाण मारितोसी ॥
रम्य वदनीं नांदोनि दिपवितोसी ॥
भव्य वक्षीं तूं लपुनि मोह देशी ॥१॥

वै०– मित्रा आतां हे तुझे वृथा प्रलाप काय कामाचे? ज्या रूपाचें तूं एवढें वर्णन करितोस, त्याचें अंतरंग सोडून कीं रे आलास!

चं०– होय रे सख्या! केवढी मी चूक केली!

पद (काय मला भूल पडलि)

मोहचि कीं शाप अहा! जाहला मला ॥
सुंदरिचा प्रणय भाव नाहिं जाणिला ॥ धृ० ॥
सुंदर नव रत्न असें जवळ येउनी ॥
संदेह धरुनि हाय! दिलें त्यासिं लोटुनी ॥
सस्मित मुख, चोर दृष्टि, लाज दावुनी ॥
काय न अभिलाष युक्तिनेंचि सुचविला ॥ मोहचि० ॥

सख्या, तिची लोलदृष्टि! ती चंचलता! तें अधर स्फुरण! तो अंगविभ्रम! हीं सर्व लक्षणें कशाचीं आहेत सांग बरें!

वै०– ते तिच्या यौवनाचे स्वाभाविक विकार!

चं०– छे छे! ते अंतर्गत मदनाचे विलास तुझ्या प्रियमित्राच्या दर्शनानेंच उद्भवले आहेत!

वै०– कशावरून?

चं०– मदन सारिकेच्या विवाहाचें वृत्त तुवां ऐकलेंच आहे! शिवाय तिच्या विशालवक्षस्थलाची सहचरी ही रत्नमाला जवळच आहे! तिला विचार!

वै०– आपणच विचारावें.

चं०–

दिंडी.

पुण्य होतें पदरांत तुझ्या माले ॥
ह्मणुनि तुजला तें हृदय गे मिळालें ॥
सानुरागें दे जधीं ती मला गे ॥
काय होता संल्कप तिचा सांगे ॥१॥

वै०– अरे! तुझ्या सखीच्या हृदयाची ही रत्नावली आज स्तब्ध कशी बसली!

चं०-- अरे! माझ्या शून्य हृदयाच्या सहवासानें ही ज्ञानशून्य झाली!

वै० –(आपणाशीं) काय माझ्या मित्राची ही अवस्था! (उघड) वयस्या! अभिनव मालतीपुष्पाप्रमाणें सुकुमार अशी तुझी सुंदरी तुझ्या प्रेमळ हृदयांत असून त्यास शून्य कसें ह्मणतोस?

चं० – मित्रा! नाहीं रे नाहीं!

दिंडी.

सुंदरी ती हृदयांत जरी आहे ॥
हृदय माझें गंधर्वपुरीं राहे ॥
धुंडिताहे परि तीस जगामाजी ॥
शून्य माझा हा देह पहा आजी ॥१॥

अथवा तिच्या प्रथम दर्शनेंच या देहांत तिचीं अनेक रूपें बिंबून गेलीं आहेत असें ह्मण! अहाहा! धन्य तीं रूपें! ज्यांस विरह, लोकनिंदा, लज्जा वगैरे कांहीं नाहीं! तिची मनोमय मूर्ति –

श्लोक.

कधीं स्मित मुखें मला कवळुनी अहा! चुंबिते ॥
कधीं सरुनियां दुरी प्रणय रोषही दाविते ॥
कधीं नयन कौतुकें स्मितमुखी करें झांकिते ॥
कधीं श्रवण संपुटीं मधुर भाषणें ओतिते ॥१॥

वै० –काय हे विलक्षण कामीजनांचे मनोरथ! मित्रा! तुझी विरह-व्यथा पाहून माझा जीव तिळतिळ तुटतो! अरे! हें अच्छोद सरोवराजवळचें तपोवन पाहिलेंस का? ही वनश्री तुझ्या दुःखित व संतप्त मनाचें रंजन करील.

श्लोक.

तरू छाया देती विमल कुसुमें सुंदर लता ॥
फलें नाना धान्यें पिकुनि वरिती हे[1] सुजनता ॥
नदी वाहे पाहे परम सुख दे आश्रमपदा ॥
उणें कांहीं नाहीं सुखाचि भरलें या स्थळिं सदा ॥१॥

आणखी पहा चमत्कार!

---

१ तरू.

श्लोक.

तरंगांच्या योगें, पवन हृदया शीत गमला ॥
गमे हा हंसाचा कलरव अहा! गोडाचि मला ॥
नदीचीं हीं ऐशीं हृदय हरिती रम्य पुलिनें ॥
जिथें ठायीं ठायीं गळुनि पडती चित्र सुमनें ॥१॥

हीं पहा हारिणबालकें विश्वासानें दर्भांकुर तोंडीत आहेत, व कांहीं ऋषिकुमार आनंदानें त्यांची सेवा करीत आहेत. तसेंच—

श्लोक.

अच्छोद रम्य लहरी सुख देत आहे ॥
हा शीत वात विरहीजन मित्र पाहे ॥
शोभा अपूर्व नवपुष्पित मंडपाची ॥
प्रत्यक्ष जीवनकला विरहातुराची ॥१॥

चं० —वयस्या! प्रिये वांचून मला सर्वत्र शून्य दिसतें.

श्लोक.

दिसेना ती मातें, परम विमला सौख्य सरिता— ॥
त्यजी चित्ता, चिंता जडवुनि मला दे विकलता ॥
सदा आनंदाचें सदन कवणें हाय हरिलें ॥
दया सिंधो बंधो! अहह! अवघे यत्न हरले ॥१॥

वै० —हे रसिक हृदयानंद चंद्रा! हा संध्यासमय तुझें कसा रंजन करणार नाहीं?

श्लोक.

अस्ताचलास बघ सोज्वळ सूर्य गेला ॥
आरक्त वर्ण जणु पश्चिम सिंधु झाला ॥
आरक्त देति मुनि चंदनयुक्त अर्घ्यें ॥
त्यांची जणों अरुणता रविलागिं लागे ॥१॥

आणखी—

साकी.

तपोवनांतिल तरुवर किसलय रक्तचि रविनें झाले ॥
प्रवालपल्लवसम नभ, संध्या रागें रंगुनि गेले ॥
वल्कल माला ही ॥ वाळे जणु रक्तचि पाही ॥१॥

चं० –अरे ह्या संध्या समयानें काय अनर्थ केला पहा!

श्लोक.

गेला सूर्य! मिटोनियां कमलिनी खिन्नाचि या जाहल्या ॥
त्या नाथा स्मरुनी मनीं जणुं तपी पाण्यामध्यें बैसल्या ॥
गेला हा अनुराग घेउनि रवि प्राणेश्वरीचा अहा! ॥
केले खिन्नाचि चक्रवाक विरहें, माझ्यासवें तूं पहा ॥१॥

आणखी पहा—

गेला मित्र, उदास चंद्र ह्मणुनी आकाश सिद्धाश्रमी ॥
वैराग्या, सित वल्कलां वरिल हा सप्तर्षिच्या संगमीं ॥
तेणें होतिल खिन्न या सकलही तारांगना निश्चयें ॥
मोहानें पडतील रे क्षितितळीं! पाहे छळी दैव हें ॥१॥

मला वाटतें जिकडे तिकडे हें विश्व दुःखमय झालें आहे! सख्या कोठें ती कादंबरी पाहूं?

वै० – अरे धीर धर, तुझ्या दर्शनानें जर तिच्यावरही पंचबाणाचा प्रखर शरप्रहार झाला आहे, तर देवी महाश्वेता लौकरच तुला ती भेटवील.

चं० –हाय हाय! येवढें माझें नशीब कोठचें?

श्लोक.

चिंतिला मनें नाथ हा जरी ॥
तीस बंधुची वंद्य वैखरी ॥
स्वैरिणी न ती ठाउकें तुला ॥
तात जो धरी नेम तो भला ॥१॥

हे उत्कंठित मना, आतां तुला ती सुंदरी कशाची भेटते?

वै० –तूं विचार करून पहा बरें. त्या गंधर्व राजकन्येची तुझ्या विरहानें काय दशा झाली असेल ती!

चं० –ती सुकुमार सुंदरी व्याकुल होत्साती या निर्दयाचें कपटजाल मनांत आणून खिन्न होत असेल! आणखी—

साकी.

मदन शरांनीं व्याकुळ होउनी तळमळ करित असेल ॥
मम विरहें ती क्षितिवरि बहुधा उरली हाय नसेल ॥
निर्दय हें पाहे ॥ अझुनी उर उरलें आहे ॥१॥

(मूर्च्छित होतो)

वै० —मित्रा! सावध हो! सावध हो! अहो! या दुर्धर विरह दुःखास कादंबरीच्या मनोरम दर्शनावांचून औषधच नाहीं!

श्लोक.

जेथें प्रसन्न मुखचंद्र सदैव राहे ॥
जें चंद्रिका रसभरें जणु शीत आहे ॥
ऐसें वपु स्मित मुखें परिरंभणातें ॥
देईल, तो सुदिन या विरहाकुलातें ॥१॥

चं० —(सावध होऊन) अहाहा! हें निष्ठुर दैव कसें हात धुवून माझ्या पाठीस लागलें आहे.

दिंडी.

महाश्वेता वत्सला प्रेम गेहीं ॥
चंद्र वदना दावोनि मोद देई ॥
अहो शोभे पल्लवें प्रेमवल्ली ॥
फलाशेनें आनंद वृत्ति झाली ॥१॥

साकी.

तोंचि गुरूची आज्ञा मध्यें आणुनि या दैवानें ॥
मनोरथाचा पर्वत माझा चूर्णचि केला जाणें ॥
जीवन जीवाचें ॥ हरिलें जणुं या तृषिताचें ॥१॥

वै० —मित्रा! तुझ्या अगाध हृदयास हा विरहानल वडवाग्नीच झाला आहे! हे सर्व खेळ त्या निर्दय मदनाचे आहेत!

चं० —हे मदना—

अंजनी गीत.

भस्मीभूतचि जरि तूं असशी ॥ वरि वरि संतापातें देशी ॥
दग्ध करुनि कां नच टाकीशी ॥ माझ्या या तनुतें ॥१॥

वैशंपायन—मित्रा! तुझ्या संतप्त हृदयास ही मनोरमा रजनी आनंद देईल.

दिंडी.

शुभ्र झालें वन सर्व चंद्रिकेनें ॥
सारवीलें जणु विश्व हें सुधेनें ॥
मंद शीतल सर्वत्र वायु वाहे ॥
गंध कुसुमांचा मोद देत आहे ॥१॥

आणखी—

कटाव.

चंद्रकिरण हे जगीं पसरले, तरुवर गिरिवर शुभ्र जहाले, सुनील नभ चंदनें लिंपिलें,दरीं कंदरीं लता मंडपीं, तिमिर दडे त्या पिटाळिती कर, विवरीं शिरुनी भूतल धुंडिति, सुरम्य शिखरें, लता मंदिरें, धवलित करिती, नक्षत्रां संक्षेपचि देती, कमलवनातें मिटुनि टाकिती, तरंगती जल तरंगभागीं, उपवन सारें लख्ख करीती, चंद्रकांतमणि शिलांतुनी जणु अमृत स्रजती, जिकडे तिकडे अफाट दिसती, रम्य वनें हीं विश्वामाजी शुभ्र चंद्रिका, भरोनि उरली, जणों चंद्र, कर्पूरचूर्ण हा उधळित आहे! ॥ ऐशी ही अभिनव शोभा ॥ आनंदाचि देइ जगासी ॥१॥

चं०—वयस्या! ही मनोरमा रजनि कशी ह्मणावी!

दिंडी.

अंधकारें दशदिशा व्यापणारी ॥
जणों चिंतामूर्ति ही होय सारी ॥
लांछनानें कर मलिन चंद्रम्याचे ॥
दीप्त झाले जणु बाण मन्मथाचे ॥११॥

वै०—सख्या! हें पक्षपाताचें भाषण नव्हे काय?

श्लोक.

विश्वाचें छत्र जाणों रजत कलश जो शुभ्र ऐसा सुधेचा ॥
कीं प्राची दिग्वधूचा विमल तिलक जो शीतला चंदनाचा ॥

कीं साक्षात् डोह आहे त्रिभुवनसुषमापूर्ण सौंदर्य ह्यांचा ॥
किंवा आनंदकंद त्रिजगसख! असा निंदिशी चंद्र कैसा ॥१॥

पहा पहा बरें—

श्लोक.

जणों चंद्रिकेच्या जलें सिक्त झाला ॥
असा वायु आनंद देई मनाला ॥
झणी डोलवी कोमला पल्लवांतें ॥
सुटे गंध! उल्हास द्याया मनातें ॥१॥

चं० —सख्या! माझ्या हृदयातुर हृदयास हा चंद्रमा संताप देतो त्यास मी काय करूं?

साकी.

जेणें कुमुदें प्रसन्न होती तोचि चंद्र कमलांतें ॥
प्रसन्न करण्या समर्थ आहे काय? कथी तूं मातें ॥
देई संतापा ॥ सुखकर चंद्र तुझा बापा ॥१॥

वै० —मित्रा! तुझी ही दुर्धर विरहव्यथा पाहून मला करुणा येते.

साकी.

व्याकुळ होउनि तळमळ करिशी दुर्धर संतापानें ॥
मलयज, मंद पवन, जलकणही तापद तुज विरहानें ॥
पल्लव शय्याही ॥ भाजी वरि वरि तुजपाही ॥१॥

आतां तुझ्या विरह शांतीला कोणता उपाय करावा?

चं० —मित्रा! अशा वेळीं जीव धारण करण्यास ही प्रियेच्या हृदयाची सहचरी रत्नमाला मात्र एक साधन आहे!

साकी.

कवण्या पुण्यें तुज दयितेचें प्राप्त हृदय गे झालें ॥
त्याचि पदें मी जाउनि होइन धन्याचि लोकीं माले ॥
प्रेमा आर्येचा ॥ पुण्यप्रद गे तो साचा ॥१॥

(पत्रलेखा येते)

चं० — कोण! पत्रलेखे! येये बाले! देवि कादंबरी कुशल आहे ना?

पत्र० –ती कसें तरी जीवित धारण करिते आणखी काय? सांप्रत आपणासाठीं देवीस फार आयास होत आहेत.

चं० –ते कसे?

पत्र० –देवीचा प्रज्वलित विरहाग्नि शांत करण्यास कोमलपल्लव व्यर्थ झाले! मलयवायु थकून गेला! धारागृहें विफल झालीं! अंगराग संताप दाता झाला!

वै० –केवढी दुर्धर विरह व्यथा ही!

चं० –

साकी.

कोमल हृदयें कशीं स्त्रियांचीं दुर्धर या विरहातें ॥
सोसुनि उरती क्षितिवरि वाटे आश्चर्यचि हें मातें ॥
टोला मदनाचा ॥ होय असह्यचि गे साचा ॥१॥

पत्र० –महाराज, अशावेळीं एक उत्कंठा व आशा ह्यांचा मात्र त्यांस आधार असतो.

चं० –अशी सखीची उत्कंठा असावी तरी कशी?

पत्र० –महाराज, ती मी कशी वर्णन करून दाखवूं?

श्लोक.

मनीं ध्यानीं स्वप्नीं सतत तिस हें रूप दिसतें ॥
तिला आनंदाचें सदन जणुं हें नाम गमतें ॥
सदा या रूपातें स्मरुनि लिहिते चित्र सुदती ॥
कथा या पायांच्या निशिदिनिं तिला गोड गमती ॥१॥

मदनज्वरांतील देवीचें बरळणें काय तें आपल्या विनोदाचें!

वै० –मित्रा ऐकलेंसना?

चं० –पत्रलेखे! देवि कादंबरी उदार, गंभीर, दयाळु व अत्यंत कोमल मनाची आहे! अहाहा! त्यावेळीं सर्व सुखास शत्रुवत् जी लज्जा तीस तिनें मान देऊन आपण विरहानलांत दग्ध झाली! त्यासमयीं हा दासजन देवीचा ओठ केव्हां हालतो याची वाट पाहत उभा असतां, तिच्या आज्ञेनें निर्दयपणानें मौन धारण केलें!

श्लोक.

दया करीना जरि चंद्रमूर्ति ॥
येईल कां पाझर चंद्रकांतीं? ॥
वसंतलक्ष्मीविण अन्य कैशी ॥
देईल पुष्पें तरु पल्लवांसी ? ॥१॥

आणखी—

मोदें येइल भृंग धांवत सयें उत्फुल्ल होणें परि॥
पद्माच्या कलिकेचिया करिं नसे तें निश्चयें सुंदरि ॥
होतां निष्ठुर ती प्रसन्न रजनी, जी चंद्रिकेची सखी ॥
लोकीं या कुमुदांसि कोण पुसतो? तज्जन्म गे व्यर्थ कीं! ॥१॥

पत्रलेखे, खरोखर माझें निष्ठुर वर्तन पाहून ती सुंदरी रुष्ट झाली असेल!

पत्र० —महाराज, जेथें दया व प्रेम ह्यांचाच प्रभाव आहे, अशा देवीच्या हृदयांत रोष कशाचा?

चं० —याचें नांव सुजनता!

पत्र० —महाराज, देवीस आपलें जसें वेड लागलें आहे! देवीच्या हृदयांतील आपली मूर्ति दुर्धर कामाग्नीनें दग्ध होईल, या भीतीनें ती त्यावर नयनाश्रूंचा अभिषेक करिते व धडधडणाऱ्या हृदयांतून ती जाईल या भीतीनें ती त्यावर वारंवार हात ठेविते. त्याचप्रमाणें सखीजनांस आपल्या नांवानें हांक मारून लज्जित होते.

चं० —अहारे माझ्या रूपा! माझ्यापेक्षां तूंच दैवशाली खरें!

पत्र० —देवा! याप्रमाणें देवी विरहातुर होत्साती एक एक दिवस कष्टानें कंठीत आहे! ह्मणून देवि महाश्वेतेनें आपणास अशी विनंति केली आहे कीं आर्यांनीं मला भेटल्या शिवाय जाऊं नये.

चं० --बरें तर तूं जा. मी देवी महाश्वेतेच्या दर्शनास जातों. हें घे कर्णभूषण!

पत्र० —महाराज, मी देवीस अपूर्व असा कोणता निरोप सांगूं? महाराजाकडील निरोप नाहीं असें ऐकतांच देवीची बाष्पपूरित दृष्टि माझ्या हृदयास बाणाप्रमाणें लागेल.

चं० – पत्रलेखे देवीस सविनय असें सांग कीं हे चारुसुंदरि तुवां आपल्या सरल स्वभावानें या जनावर प्रसाद केला तथापि तुला अरसिका-प्रमाणें सोडून येणारा जो हा दुष्टांतील अग्रेसर व ज्यानें त्यासमयीं अज्ञान, निष्ठुरत्व, व कृतघ्नता यांचेंच अवलंबन केलें, त्यानें तुज सारख्या उदार सुंदरीस पुनः प्रसन्न होण्यास कोणत्या सद्गुणाच्या आधारें विनंति करावी? खरोखर—

साकी.

केवळ एका स्नेहलतेचें दुर्मिळ फळ हा लाहे ॥
सद्गुण एकहि माझा मजला अझुनी न दिसे पाहे ॥
प्रेमळ देवीचे ॥ गुण मज आधाराचे साचे ॥१॥

कारण—

दिंडी.

मला रक्षी तव सरलता सदा ही ॥
स्नेहवल्ली मज बोलविते पाही ॥
जणों वात्सल्यें हृदयमंदिरान्तीं ॥
धरुनि बसशी हा स्वजन कुंददंति ॥१॥

त्याचप्रमाणें तुझी मधुरवाणी जशी काय मजबरोबर बोलतच आहे, आणि आतां जी या मनास तुझ्या दर्शनाची उत्कंठा उत्पन्न झाली आहे, तीस कारण तुझे प्रसादच होत. पत्रलेखे आणखी देवीस सांग कीं तुझ्या उदार हृदयानें या जनास ठाव दिला आहे. तसेच तुझ्या थोर व दयाळु स्वभावानें याचे सर्व अपराध क्षमा केले आहेत, व तुझ्या अकपट स्नेहाचा झरा या क्षुद्रजनावर अखंड वाहत आहे, या योगानें हा आपणास धन्य ह्मणवीत आहे, व यास कारण केवळ देवीच्या प्रसन्न हृदयाचा प्रसाद होय, व हाच प्रसाद—

पद (जल भरन)

झाला केवळ शिक्षक मातें उत्साहा दे तव सेवेतें ॥धृ०॥
मंजु मंजु वचनें तव आर्जव करण्या शिकवी प्रेमें मातें ॥झाला०॥

तव गुण वर्णन करवुनि वारि वरी आकर्षी या मनोमृगातें ॥ झाला०॥
न्याया कोमळ चरणापाशीं प्रणयें ओढी सुंदरि मातें ॥ झाला० ॥ १ ॥

असा तुझ्या प्रेमळ हृदयाचा प्रसाद केवळ माझ्या आनंदाचें स्थान आहे. आणखी पहा, देवि, ज्या ह्या माझ्या वाणीनें, मी येते समयीं तुझ्या आज्ञेचें उल्लंघन केलें व जिनें मला त्यावेळीं इकडे येण्याविषयींच सूचना केली, देवीच्या पवित्रचरणापाशीं राहण्याविषयीं मूकभाव दर्शविला! तीच तीच ही माझी वाणी ह्या वेळेस मला आर्जवानें ह्मणत आहे कीं, देवीस सांगून पाठीव कीं, "कसेंही करून तूं आपले प्राण रक्षण कर. नाहीं तर हा चंद्रापीड तेथें येऊन सर्व व्यर्थ होईल. व सर्व जगत् त्याला शून्य भासेल."

पत्र० —जशी आज्ञा! (जाते)

वै० —मित्रा! या स्थळाच्या दर्शनापासून मला चुकल्यासारखें कांबरें होतें?

श्लोक.

आकार्षे तें प्रणयजाल जणों मनातें ॥
वाटे सुहृज्जनाचि देइल जीवनातें ॥
दृष्टिभ्रमें खिळियलें वपु त्या स्थळातें ॥
कोणा स्मरे हृदय हें नकळेचि मातें ॥ १ ॥
अच्छोदा वरुनी सुगंधमय ये जो गार वारा तयें ॥
जेथें डोलुनि रम्य पल्लव जनां बोलाविती हो स्वयें ॥
ऐशीं फुल्ल लतागृहें, हिमगृहें जाणों दुजीं भासती ॥
संतापा शमवोनियां विरहिणी चित्ता जणों तर्पिती ॥ २ ॥

(पडद्यांत गायन होतें.)

पद. (कोवळीरे माझी काया रूप कोवळें० ही चाल)
अमृतकरांनीं धवलित करुनी प्रसन्न जग हें करी
आनंदा मम, तिमिरा परिहा चंद्र हरिल झडकरी ॥ धृ ॥
मंद पवन अच्छोदसराशीं झगडुनि येई जरी ॥
दे संतापा माझ्या देहा अग्नि कणांच्या परी ॥
शिला तळावरि दयिता स्मरुनी तळमळते वारि वरी ॥

अंधकारमय धैर्यचि माझें बळें चंद्रमा हरी ॥
उष्ण हे किरण लागती हो ॥ उष्ण० ॥
नेत्र हे अश्रु ढाळिती हो ॥ नेत्र० ॥
शोकाब्धि खवळला अति हो ॥ शोकाब्धि० ॥
प्राणविसावा हरुनी छळितो चंद्र! अहा! वरि वरी ॥
आनंदा मम, तिमिरापरि हा चंद्र हरिल झडकरी ॥ अमृत० ॥

वै० —अहाहा! या मनोहर शब्दांनीं तर माझ्या हृदयाचें पाणीच करून सोडलें!

चं० —मित्रा! देवि महाश्वेता विरहातुर होत्साती अत्यंत विकळ होत आहे! चल चल! संकट समयीं तिला साह्य केलें पाहिजे.

(तरलिका महाश्वेतेसह येते)

महा० —किती हो मी मंदभाग्या!

श्लोक.

आशा देउनियां मनोरथ वृथा केला सखीचा अहा! ॥
केला खिन्न तिचा पिता, विरह म्यां देवोनि तितें महा! ॥
गेहीं आणुनि पाहुणा प्रिय जरा केलें न त्याचें पहा!
मारोनी दयितासिं दुःख पदरीं म्यां बांधिलें हें अहा! ॥१॥

वै० —अहाहा! धन्य तो तुझा सखा! ज्याच्याकरितां तूं इतकी व्याकुळ होतेस! सखे! महाश्वेते! हे शब्द मलाच अनुलक्षून नव्हेत कां?

चं० —मित्रा! हें काय करतोस?

वै० —छे छे! मी!! मीच तिच्या विरहाचें कारण!!

साकी.

मदन मित्र हा चंद्र जाळितो मजला प्रखर करांनीं ॥
मदनज्वर हा असह्य झाला रक्षी दया करोनी ॥
आलों शरण तुला ॥ व्याकुळ जीव पहा झाला! ॥१॥

चं० —(त्यास आवरून) वैशंपायना! असें हें उद्धटपणाचें कृत्य तुझ्यासारख्या थोर कुळांतील कुमारास शोभतें कां? अरे तुझी शुद्धि गेली कोठें? विनय काय झाला? मनोनिग्रह क्षणांत कसा नाहींसा झाला!

विचार कर! ही परम पवित्र पातिव्रता! हिचा कोप क्षणांत काय करील याचा नियम नाहीं! काय ही तुझी भयंकर स्थिति!

पद (जल भरन)

होउं नको वश मूढा मदना, नीच कर्म हें सोडुनि देई ॥धृ०॥
रोमांचित ही तव तनु कांपे घर्म जलानें भिजली पाही ॥ हो०॥
उर धडधडुनी आवरितें तुज पाप भया धरि! मत्त न होई ॥हो०॥
चंचलता त्याजि धृष्ट न होई लाज धरुनियां सत्पथ घेई ॥ हो० ॥
पतिव्रतेचा छळ तूं करुनी शाप बळें बा दग्ध न होई ॥हो०॥

वै०—चलचल! चालला उपदेश करावयाला! सखे महाश्वेते! या दासानें असा कोणता बरें अपराध केला आहे? आज अशी निष्ठुर कां-बरें झालीस? तुझें स्वाभाविक सौजन्य कोठें गेलें?

साकी.

कष्टविलें म्यां विरहा देउनि करी क्षमा मज आतां ॥
प्रसन्न होउनि पदरीं घेई आर्ये तूं निजनाथा ॥
व्याकुळ हा पाहे ॥ तव पद लीनचि हा आहे ॥१॥

(आलिंगूं पहातो)

महा० —(मागें सरून) हे कुमारा! काय हें बोलतोस! विचार कर! मत्त होऊं नको!

चं० —मित्रा! पतिव्रतेचा कोप चांगला नाहीं! आर्ये महाश्वेते! या दीनावर कृपा कर! मित्रा! —

वै० —कोणालारे मित्रा ह्मणतोस?

चं० —वैशंपायनाला!

वै० —कोण वैशंपायन?

चं० —तूं.

वै० —तुझा वैशंपायन मी जाणत नाहीं!

चं० —हाय हाय! माझा मित्र मदनवश झाला!

वै० —हे सुंदरि, कोमल मालतीच्या मालेप्रमाणें रुचिर तनु ह्या खडतर तपानें तूं कोमेजून टाकीत आहेस! हे मनोहारिणी!—

साकी.

कोमल नलिनीवरी हिमाचा दुर्धर पाताचि जैसा ॥
तैसा तुझिया रुचिर तनूतें चुरडी भार तपाचा ॥
कथणें कैशाला । हितचतुरे तुज रसिकेला ॥१॥

हे शृंगारलतिके, तुझ्यासारख्या अभिनव तरुणीस जर हे क्लेश, तर त्या मूढा कामदेवानें धनुष्य सज्ज करून काय केलें? या अभिनव वसंताचा काय उपयोग? या आनंदकंद चंद्राचें काय फल? हा मलय वायु हीं उपवनें, हीं सुंदरपुलिनें व हे अत्यंत आल्हाददाते लतामंडप हीं व्यर्थ आहेत! देवि, कृपा कर! कृपा कर! अहाहा! किती मनोहर रूप हें! (स्पर्श करूं पाहतो.)

महा० –(दूर सरून) खबरदार, मला स्पर्श करशील तर! येथल्या येथेंच प्राण देईन! ब्रह्मदेवानें तुला मनुष्य कशाला केलें ?

वै० –देवीच्या अनुरागाचें फळ पदरीं पाडून घेण्यास!

महा० –पुनः अपमान देणारे शब्द! केवळ विनोदार्थ बोलणारे जे शुक त्यांच्या भाषणाचा जसा राग येत नाहीं, तद्वत् तूं एखाद्या तिर्यग्योनींत जन्मतास, तर तुझ्या भाषणाचा राग नसता.

वै० –देवि, असो ती तिर्यग्योनि! (पुनः स्पर्श करूं पहातो.)

महा० –पुनः अविनय! हो तर मग शुक!

(वैशंपायन मूर्च्छित पडतो, व पडदा पडतो.)

चं० –हाय हाय! केवढा मी पापकर्मा! आपल्या समक्ष मित्राची दुर्दशा पाहणें माझ्या दैवीं आलें! हाय हाय! गेला! गेला हो मित्र पोपट होऊन उडून! हा वैशंपायना! हा प्राणमित्रा! आतां तुला कोठें पाहूं? सख्या—

साकी.

दीन दशा ही सन्मित्राची दैवीं ये देखाया ॥
साह्य न करवे संकट समयीं! जन्मुनि झालों वाया ॥
हरहर या हृदया । लेश न उरली हो माया ॥१॥

महा० –राजपुत्रा, तो आपल्या पापकर्माचें फळ घेऊन निघून गेला, त्याच्याकरितां तूं कां कष्टी होतोस?

चं० – भगवति! असें नव्हे!

श्लोक.

नांदे जेथें सर्वदां शुद्ध भाव।
जेथें दोघांमाजि हो एक जीव॥
दुःखीं सौख्यीं सारिखे भाग ज्यांचे॥
ऐसे हो, जे मित्र, ते धन्य साचे॥१॥

तर देवि! तूंच सांग माझें हृदय किती कठोर आहे तें! मित्राची अशी स्थिति पाहून हें अजून उलत नाहीं! तर ह्याला चांगलेंच शासन केलें पाहिजे! आर्ये महाश्वेते, ज्याप्रमाणें या जन्मीं माझ्या करितां त्वां अकपट सौजन्यानें देवी कादंबरी विषयीं श्रम केलेस त्याप्रमाणें जन्मो जन्मींहीं अकारण वत्सलता धरून मला साह्य कर! हे कादंबरी! हे गंधर्वराज-कन्ये! हे प्रिये! हा सख्या वैशंपायना! (मूर्च्छित होऊन हृदय भेद होतो.)

तरलिका –देवि महाश्वेते! अनर्थ! अनर्थ! अहो! हा निचेष्टित झाला! याची मान मोडली! हृदय भेद झाला! (पडदा हळू हळू पडतो) हाय हाय! एकाएकीं अदृश कीं हो झाला! आतां काय करूं?

महा० –हे महापापिणी हे पाषाणहृदये महाश्वेते! हें काय केलेंस त्वां!

साकी.

भूत भ्रम हा! स्वप्न असे हें! इंद्रजाल हें साचें॥
हृदय भ्रमलें नकळे झालें काय अहो बंधूचें॥
हरहर मी कैशी। आल्यें व्यर्थचि जन्मासीं॥१॥

[पडदा हळू हळू पडतो.]

अंक तिसरा.

(पत्रलेखा व कादंबरी येतात.)

पत्रलेखा — देवि कादंबरि! आज तूं देव चंद्रापीड याच्या दर्शनास जात आहेस त्यामुळें तुझें मोहक स्वरूप किती रमणीय दिसतें ?

दिंडी.

आजि झालें मुखकमल सुप्रसन्न ॥
धन्य रमणाचें दैव होय धन्य ॥
रुचिर सुंदर सुकुमार केतकीचें ॥
तुझ्या सर्वांगीं दिव्य तेज नाचे ॥१॥
शालु शोभे भर्जरी अशा देहीं ॥
स्तनीं पुष्पांचा हार रुळे पाही ॥
जाग जागीं शोभलीं फुलें पाहे ॥
सुगंधे हा आनंद तुझा वाहे ॥२॥

आणखी—

साकी.

गुंजारव नच, जयरव करिताचि फिरते मधुकर माला ॥
छुम छुम छुम छुम मंजिर रव दे तालचि वरि वरि त्याला ॥
प्रसन्न मन झालें । जाणों सुख सन्निध आलें ॥१॥

कादंबरी —पत्रलेखे! किती समयचतुर आहेस!

पद. (भला जन्म हा तुला)

आनंदाचीं चिन्हें दिसती प्रसन्न वन देखुनी ॥
गमे भेटेल तनूचा धनी ॥धृ०॥
श्यामवर्ण घनमाला जैशी सुचवी जल वृष्टिला ।
शुभ्रदिक्प्रांत, इंदुची कला ॥

मंदगंधवह जसा सुचवी वसंत ऋतु पातला ।
रंग जो देई सुगंधी फुलां ॥
वसंत शोभा जशी सुचवी कोमल तरुच्या दलां ।
गायना करिति जेथ कोकिला ॥
काशपुष्मंजरी फुलुनि ज्या परी ।
सूचवी शरत्कालागम गे वरि वरी ॥
हें प्रसन्न जग मज सूचवितें त्या परि ।
कीं चिंताही सरुनी सुख तें आलें सन्निध म्हणी ।
गमे भेटेल तनूचा धनी ॥आनंदाची०॥१॥

पत्र० —देवि! मला वाटतें:—

श्लोक.

द्रव्यें गंधमयी सुरम्य कुसुमें तांबूल पात्रें करीं— ॥
घेती; मन्मथ संगरार्थ जणुं हीं अस्त्रें तुझ्या किंकरी ॥
या सेनेप्रति शोभशी सुचतुरे तूं नायिका सुंदरी ॥
तूतें साह्य असे कटाक्ष शरधी! कैंची जयश्री दुरी ॥१॥

कादं० —पत्रलेखे! खरेंच कायगे तो राजकुमार अच्छोद सरोवरीं आहे?

पत्र० —होय देवि! हा पहा महाश्वेताश्रम जवळच दिसतो आहे!

कादं० —

श्लोक.

चंद्रप्रभा, भुवन सारवि चंदनानें ॥
वाटे धरा विरहिणी बहु खिन्न जाणें ॥
वारा सदैव तरुपल्लव घालिताती ॥
हे चक्रवाक रडुनी तिस शोक देती ॥१॥

पत्र० —इडा पिडा टळो! अमंगळ पळो! देवि या आश्रमाची अपूर्व शोभा पहा!

श्लोक.

छाया जिथें रुचिर कोमल पल्लवांची ॥

शोभा जिथें बहुत सुंदर तोरणांची ॥
विस्तीर्ण मंडप जिथें असती लतांचे ॥
गे हें तपोवन तुझ्या प्रिय मैत्रिणीचें ॥१॥

आणखी—

श्लोक.

तुषारांहीं देती परमसुख अच्छोद लहरी ॥
सुधा शिंची प्रेमें क्षितिवरि शशी हा निजकरीं ॥
सुगंधें सौख्या दे तरुवरि नवी पुष्प रचना ॥
सदा दे आनंदा पवन, करि जो शीतल वना ॥१॥

कादं०—तूं ह्मण! परंतु मला नाहीं वाटत, कीं तो निर्दय पुनः इकडे येईल!

दिंडी.

वदन माझें जरि दीन बाइ झालें ॥
निष्ठुरें ज्या मागें न पाहियेलें ॥
जाय सोडुनि, तो आज ये कशाला ॥
व्यर्थ आशा दाविशी या मनाला ॥१॥

साकी.

गेला जेव्हां त्यजुनी मातें स्वप्न न, गे पडलें तें ॥
व्याकुल होइन, गमतें जरि गे त्या निर्दय हृदयातें ॥
निघुनी कां जाता। व्यर्थचि आशा गे आतां ॥१॥

पत्र०—देवि! केवढा संदेह हा!

कादं०—आणि तो पुनः आला तरी, मी त्याच्याशीं चकार शब्द बोलणार नाहीं! तूंच बोल!

साकी.

जरि दयिताचें दर्शन घ्याया आतुर मन हें झालें ॥
रुष्ट होउनी, हटुनी क्षणभरि मौन धरिन मी बाले ॥
प्रसाद करण्याला। विनवुं नको व्यर्थचि मजला ॥१॥

(पडद्यांत) तरलिके, या संकटीं प्रियसखी कादंबरीचें कसें होईल ?

कादं० –या शब्दांनीं माझ्या हृदयाचें पाणी केलें!

पत्र० –कोणाचा हा शब्द ?

कादं० –महाश्वेतेचा! बाई महाश्वेते!

श्लोक.

कशानें हे तूझे रडुनि रडुनी नेत्र सुजले ॥
अहा! वाटे माझ्या विकळ हृदयीं वज्र पडलें! ॥
दिसेना गे येथें दयित! वन हें शून्य दिसतें! ॥
गळा माझा बाई चरचर अहा! दैव चिरितें! ॥१॥

(मूर्च्छित होते.)

पत्र० –देवि सावध हो! सावध हो! काय आहे ऐक!

कादं० –(सावध होऊन) आतां काय ऐकावयाचें आहे! तो शुक पहा आक्रोश करीत आहे! (बोटानें दाखविते.) हा! प्रिय दयित! (मूर्च्छित होते.)

(महाश्वेता येते.)

महा० –हाय हाय! आतां सखीच्या मनाचें शांतवन कसें करूं! सखि कादंबरि! कादंबरि! सावध हो! सावध हो! हाय हाय! काय संकट हें!

पद. (अजि अक्रुर हा नेतो श्री कृष्णाला.)

हत दैवा त्वां कंठ सखीचा चिरिला। दुःखाग्नि कसा भडभडला ॥
मुखचंद्राची कांति कशी ही हरली। स्तब्ध गे दृष्टि ही झाली ॥
तनुवृत्ति अहा! मंद कशी ही झाली। जणुं चित्रापरि ही पडली ॥
(चाल) दुर्धर ही मूर्च्छा कैशी गे
शून्यत्व येइ हृदयासीं गे ॥
लागला घोर जीवासीं गे ॥
(चाल प०) कशी कळविली दुःखद वार्ता सखिला।
कां नये मरण गे मजला ॥हत दैवा०॥१॥

प्रिय सखि! हा अंतस्थ शोकाचा वेग आतां आटोप! सावध हो! देवी मदिरा, व महाराज चित्ररथ ह्यांच्याकडे लक्ष दे. त्यांना तुजवांचून कोण आहे बरें! तूंच सांगः—

अंजनी गीत.

हरहर तव सौभाग्यचि सरलें ॥ करुण रसानें हृदयहि भरलें ॥
यावरि शोकें जरि हें उरलें ॥ शून्यचि जग आह्मां ॥१॥

कादं० —सखे महाश्वेते! अगे, वज्रासारखें माझें कठिण हृदय जर फुटावयाचें असतें, तर तें येवढें दुस्तर दुःख सोसून राहिलें असतें काय?

साकी.

मेल्याहूनी मेली तीतें तात बंधु गे कैंचे ॥
सर्व सुखाचें मंदिर पडलें आतां काय तनूचें-- ॥
करिशी, जाळीही। नाथ तनूसह तूं बाई॥१॥

(मूर्च्छित होते.)

पत्र० —हाय हाय! काय संकट हें!

दिंडी.

म्लान कोमल मुखकमल दीन झालें ॥
रडुनि रडुनी जाहले गाल ओले ॥
करुण वेगें दाटोनि कंठ येई ॥
होय मूर्च्छेनें विकळ जीव बाई ॥१॥

कादंबरि, सावध हो! सावध हो! (सावध होते.)

महा० —बाई कादंबरि, तुझ्या दुःखानें दाही दिशा आक्रोश करीत आहेत.

श्लोक.

हे चक्रवाक रडती करुण स्वरानें ॥
सोडी सुधाश्रु ह्मणि धूसर चंद्र जाणे ॥
आक्रोश मर्मर रवें करि वृक्षराजी ॥
झालेचि खिन्न अवघे कलहंस आजी ॥१॥

पत्र० –सखे या दुर्धर संकटीं कोणत्या प्रकारें तुला धीर द्यावा, हें सुचत नाहीं. परंतु संकट समयीं धैर्य धरणें हेंच त्यांतून पार पडण्याचें साधन आहे. साधुसंतांचीं कल्याणप्रद आशीर्वचनें व अनुकूल दैवाचा प्रभाव विलक्षण आहे. त्या योगें प्रियजनाच्या भेटीची व कदाचित् अनुपम सुखाची आशा आहे.

कादं० –छे! छे! **साकी.**

आशा वेडी, आशा वेडी, आशा वेडी बाई ॥
दुर्दैवाचा अंत न कळला कवणालाही पाहीं ॥
माझ्या भाग्याची । झाली सीमा ही साची ॥१॥

महा० –नको, नको, सखे, आपल्या कोमल हृदयास या कठोर शोकाच्या भरानें चिरडून टाकूं नको. पाहिलासना हा सर्व वनप्रदेश शोकानें कलुषित झाला आहे. ह्या पहा वनलता, ज्यांनीं आपल्या सुगंधी पुष्पांनीं पूर्वी या राजकुमारावर केवळ अमृतवृष्टीच केली, त्या देखील आज अत्यंत खिन्न होत्सात्या पुष्प मिषानें अश्रु बिंदूच टाकूं लागल्या.

कादं० –सखे महाश्वेते, या वनलतांकडे पाहून मला अतिशय गहिंवर येतो.

श्लोक.

तुषार स्पर्शानें टवटवुनियां पल्लव जिथें ॥
सुगंधें पुष्पांच्या सुखद गमले त्या सुतनुतें ॥
लतागेहें आतां हरहर कशीं शून्य दिसती ॥
लता माझ्यासंगें त्यजुनि मकरंदाश्रु रडती ॥१॥

(मूर्च्छा पावते.)

पत्र० –सखे सावध हो! सावध हो!

महा० –कादंबरि सावध हो! सावध हो!

साकी.

मूर्च्छित होउनि धडधड पडशी क्षितिवरि आर्ये कैशी ॥
करुणभरें या रडविशि वरिवरि दीना या स्वसखीशीं ॥
दुःखानल पेटे । जाळिल हा त्रिभुवन वाटे ॥१॥

कादं० –(सावध होऊन) सखे महाश्वेते—

श्लोक.

सोडोनियां स्वकुल-रीतिस येथ आल्यें ॥
लज्जा त्यजोनि मदनानल-दग्ध झाल्यें॥
दैवें परंतु सखि या क्षणिं विघ्न केलें॥
माझें न कां विफल जीवित बाइ झालें ॥१॥

आणखी—

साकी.

तव दुःखातें विसरुनि झाल्यें वश जेव्हां स्वहितातें ॥
कैसा रोष न येईल आर्ये माझ्या प्रिय दयितातें ॥
जेव्हां तो गेला ॥ जगणें उचित न गे मजला ॥१॥

महा० –हाय हाय—

श्लोक.

हें दुःख गे न परि वज्रचि होय पाहे ॥
वेगें जणों हृदय चूर्ण करीत आहे ॥
पीयूषपात्र सुखसंगम द्यावयाचें ॥
तें आज हें विषरसें भरलेंचि साचें ॥१॥

कादंबरि! धीर धर, धीर धर, गुरुजन केवढा अनर्थ करील, इकडे लक्ष्य दे.

कादं० –सखे महाश्वेते, तूंच सांग, ज्यानें माझ्याकरितां आपल्या पंचप्राणांचा त्याग केला, कादंबरि, कादंबरि ह्मणतच गेला, तो माझी वाट पाहत असेल कीं नाहीं? या प्रसंगीं जगणें हेंच मरण नव्हे काय?

पत्र०– हरहर या राजकुमाराच्या मरणानें केवढा नाश झाला पहा!

पद. (नाथाच्या घरची उलटी हि खूण)

झालें शून्याचि जग या सखीतें ॥ विघ्नचि घडलें सु मनोरथातें ॥धृ०॥
सौभाग्य राज्यश्रीचें गेलें ॥ शौर्य जगीं या निर्मूळ झालें ॥ शू०॥
अंतचि झाला सकला कुलांचा ॥ हरपे निधि गे सर्व रसांचा ॥शू०॥
आधार तुटला दीन जनांचा ॥ होयचि शेवट सकल गुणांचा ॥ शू०॥
लावण्याम्बुधि प्रणयीजनांचा ॥ जीवचि गेला सकल स्त्रियांचा ॥शू०॥

महा०— आर्या चंद्रापीडा! सखि कादंबरीवर केवढें तुझें प्रेम!

श्लोक.

जधीं धारा गेहीं तळमळ करी प्राणरमणी ॥
दयासिंधो आली सहज करुणा प्रेमळ मनीं ॥
गमे संबोखावें तिस परि अहा! मार्ग नवता ॥
कशी आनंदाच्या गिरिवरुनि ये शोक सरिता ॥ १ ॥

कादं०— सखे महाश्वेते, या मंदभाग्येच्या हातून तुझें कांहींच प्रिय झालें नाहीं, ह्मणून मला क्षमा करून, मला आपल्या हातानें प्रियाबरोबर पाठीव. तूं मजवर अत्यंत स्नेह करीत आहेस तर प्रिय सखि, तूं एवढें मात्र कर—

श्लोक.

पिता माता शोकें त्यजितिल सखे प्राणचि तयां ॥
स्वयें धैर्या देई मजसम तयां तूंचि तनया ॥
बघोनीयां माझ्या रडतिल, सखे शून्य सदना ॥
वये माझ्या मागें क्षम असशि तूं दुःखशमना ॥१॥

आणखी—

साकी.

माझ्या मागें तूंचि गुरुजनां स्वयें तिलांजलि देई ॥
आप्त बंधु वा कन्या सुत ते तूंचि तयांनां होई ॥
जन्मो जन्मीं ही ॥ होय सखी तूं मम बाई ॥१॥

महा० —हाय, हाय, कोण संकट हें! सखे—

अंजनी गीत.

नयनांतुनि जें वाहे पाणी ॥ गहिंवर अवघ्या विश्वा आणी ॥
तळमळ तळमळ वरि वरि करुनी ॥ म्लानाचि मुख झालें ॥१॥

हर हर!

श्लोक.

विलासार्थ स्वैर प्रियसखि! अहा देह सजवी ॥
सुखाच्या आशेनें वरि वरि भरे प्रेम हृदयीं ॥

सुरम्यें हीं रत्नें! रुचिर वसनें! मंगल सुमे ॥
अहा! शोका देती वरि वरि मला गे प्रियतमे ॥१॥

(रडते)

कादं०—सखे महाश्वेते! असें काय ह्मणतेस, हा श्रृंगार सहगमनास मंगलप्रदच आहे!

पद. (जलभरन)

प्रेमभरें मज त्या दयितानें विरह वन्हिनें दग्धचि केलें ॥धृ०॥
चंद्रकरांनीं, कमलदलांनीं, जलकणिकांनीं तप्तचि केलें ॥प्रेम०॥
चंदन, किसलय, सर मोत्यांचे, तापद वरि वरि मजला झाले ॥प्रेम०॥
या सर्वांहीं माझें वपु हें तिलसम सखये भाजूनि गेलें ॥प्रेम०॥१॥

तर

साकी.

प्रज्वलित ज्वालांमध्यें मी शिरुनी प्रिय दयितातें ॥
कंठालिंगन देइन पाहुनि मी त्या सुखधामातें ॥
माझें तूं घेई ॥ वंदन शेवटील बाई ॥१॥

महा०—हाय हाय!

दिंडी.

दुःख उभवे काय हें पळा माजी ॥
हृदय कळवळतें बघुनि शोक आजी ॥
जणों पर्वत कोसळे कडाडोनी ॥
चूर्ण करण्या तव हृदयरूप खाणी ॥१॥

(पडद्यांत) वत्से कादंबरि! कन्ये महाश्वेते!

मदलेखा—अहो! करुण रसाला केवढी भरती आली!

साकी.

देव चित्ररथ देवी मदिरा दुःखें या कन्यांचीं ॥
परिसुनि येती हरहर झाली! सीमा या शोकाची ॥
सुहृद् दुःखाचा ॥ दुर्धर हा भर गे साचा ॥१॥

कादं०—हे तात! हे आई!

(पडद्यांत)

श्लोक.

कन्यांनीं घोर ऐशा हरहर न मला देखवे या प्रसंगा ॥
या दुःखें आज माझें हृदय उलतसे येइ रोमांच अंगा ॥
दुःखानें माउलीही हरहर तुमची मूर्च्छिता हाय झाली ॥
साऱ्या अच्छोद भागां करुणरसभरें धूसरा कांति आली ॥१॥

मुलीनों! तर या आपल्या दीन पितरांस आलिंगन द्या.

महा०—सखे कादंबरि चल चल ह्या तातास भेटूं चल!

पत्र०—हा चंद्रमा—

साकी.

पतिव्रतेच्या छळोंचे लांछन आलें यास ह्मणोनी ॥
धूसर होउनि जात असे हा लाजुनि विश्वा त्यजुनी ॥
पर्वत दुःखाचा ॥ तुजवरि पडला गे साचा ॥१॥

(पडदा पडतो.)

अंक चौथा.

[विदिशा नगरींतील]

(कंचुकी येतो.)

कंचुकी—अहो! येवढें मोठें शूद्रक राजाचें ऐश्वर्य! समुद्रवलयांकित पृथ्वीचा धनी! ज्याचें नांव ऐकूनच शत्रूचीं हृदयें फुटून गेलीं! राजलक्ष्मी तर अंकित! निर्वीर पृथ्वी झाल्यामुळें याच्या राज्यांत परलोकाचें काय तें भय! वक्रता काय ती विलासी जनांचें हृदय चोरणाऱ्या युवतींच्या केशपाशाचे ठायीं! शस्त्रास्त्रें काय तीं मदनाचीं पुष्पमय धनुष्यें! जिकडे तिकडे आनंदी आनंद! परंतु काय हो! आमच्या महाराजांची स्थिति! सकल भूषणें त्यांनीं टाकून दिलीं! सगळे विलास सोडले! केवळ अक्षय चिंतातुर होतात! कामविकार ह्मणावा! तर तोही नाहीं! जसें कोणीं ह्मणेल कीं महाराजांचा प्रियजन हरवला आहे! पहा!—

साकी.

प्रखर मदनशर भेणें जाणों श्वास लागला आहे ॥
शरवृष्टिभरें रोमांचित तनु वरि वरि होई पाहे ॥
प्रभु झांकिति नयनां ॥ भय दे टणत्कार ज्यांना ॥१॥

तसेंच—

कुसुमशराच्या रजःकणांनीं सजल नयन हे झाले ॥
मदनाग्नीच्या धूम्रें थर थर या अधरा कांपविलें ॥
कोमल मुखकमला ॥ केवळ धवल राग आला ॥२॥

त्याचप्रमाणें अत्यंत तापानें विरघळलेलें महाराजांचें हृदय, तांबूल मिषानें बाहेर पडतें, व ओलें लांकूड जळत असतां त्यापासून जसा जलस्राव होतो, त्याप्रमाणें त्यांचें तप्त वपु घर्मानें स्रवत आहे! असो, मला प्रधानजींनीं आज्ञा केली आहे कीं, अरे वेत्रधरा! महाराजांकडे जा आणि त्यांस सांग, आपल्या आज्ञेप्रमाणें अत्यंत रमणीय अशा आपल्या नाटकगृहांत सर्व जन येऊन बसले आहेत! आज महाराजांच्या मनोरंजनाकरितां फार चतुर

अशा विदिशा देशांतील नाटककारांनीं **"अनंग विजय"** नाटक रचिलें आहे, व आज त्याचा प्रयोग होणार असें दिसत आहे.

(पडद्यांत वीणा वाजते.)

कायहो! कालातिक्रम हा! महाराज येऊन बसले देखील! मी आपल्या कामास जातों. (जातो)

(पडदा उघडतो)

नान्दी.

जिंकीयलें त्रिजग कोमल पुष्प बाणें ॥
केले स्वपाद नत हो मुनिही जयानें ॥
लोकीं असो जय अशा प्रिय मन्मथाचा ॥
जो होय हो सुखद मित्र विलासिनींचा ॥१॥

साकी.

ऐशा विजयी मदना जिंकुनि जय मेळविला ज्यानें ॥
प्रभाव ज्याचा विचित्र ऐसा अवघें त्रिभुवन जाणे ॥
ऐशा दैवाचा ॥ होवो वारि वारि जय साचा ॥१॥

सूत्रधार—महाराजांनीं आतां नाटकाकडे अवधान द्यावें! पुंडरीक हा श्वेतकेतु मुनीचा पुत्र! आपला सखा कपिंजल यासह अच्छोद सरोवरीं येत आहे! हा पहा तो भगवान पुंडरीक विमानांत बसून आलाच! (जातो)

(विमानस्थ पुंडरीक व कपिंजल येतात.)

कपिंजल—वयस्या हें काय केलेंस तुवां! कैलास पर्वतीं शिवदर्शन घेणें तें एकीकडेच राहिलें! व स्वैर विहार करीत तूं देवलोक सोडून येथें आलास! आतां तात श्वेतकेतु व जननी लक्ष्मी ह्यांचा जीव तिळतिळ तुटत असेल हें तुला माहित नाहीं काय?

पुंडरीक—मित्रा, खरें पुसशील तर मला त्या देवलोकचा कंटाळा आला आहे! सर्वदां ती वेदांत विद्या! व उदास वृत्ति!

कपिं०—अरेरे! प्रत्यक्ष मोक्षपदाचा मार्ग तो! त्याची तुवां अशी अवहेलना करूं नये.

पुंड०—वयस्या! खरोखरी या अभिनव यौवनांत त्या शुष्क व्रताचा काय उपयोग? तेथें आहे काय?

श्लोक.

विकार प्रेमाचे मुरडुनि बळें योगानियमें ॥
वृथा सद्यः सौख्यें त्यजुनि बसणें योग्य न गमे ॥
अहो! आनंदाचें स्थळ वदन जें सोज्वळ असें ॥
तपःसिद्धीचें तें विमल फळ होईल न कसें ॥१॥

तर तूं त्या निःसत्व व अरसिक तपोनियमप्रचुर देवलोकाची कथा सांगूं नको.

कपिं०—अरे तुझी बुद्धि गेली कोठें! तात माता ह्यांचे प्रेम देखील तूं विसरलास?

पुंड०—मित्रा! पितरांचें प्रेम माझ्या मनाचें आकर्षण कसें करणार नाहीं? त्या स्थळीं माझ्या आनंदास पितरांचे चरणच कारण आहेत! परंतु आज आपण फार दिवसांनीं ते कंटाळवाणे तपोनियम सोडून इकडे आलों अहों! तेव्हां मनास क्षणभर विश्रांति देऊन मग घरीं जाऊं. हा पहा रमणीय अच्छोद सरोवराचा प्रदेश!

श्लोक.

जेथें गेरु मनःशिलादि करिती रंगें विचित्रें दळें ॥
झाडी जेथ अशी, विचित्र सर हें, तेणें पहा, शोभलें ॥
पुष्पें गंधचि, शीतलत्व वारि जो शीताम्बुच्या संगमें ॥
वारा, तोय तरंग मित्र मज हा आलिंगना दे गमे ॥१॥

आणखी—

विस्तीर्ण हा बघ जलाशय रम्य आहे ॥
आल्हाद दे धवल वारि तरंग पाहे ॥
वाटे नभःस्वरुप हें अवतीर्ण झालें ॥
कीं चांदणें द्रवुनिया रसतेस आलें ॥२॥

मला वाटतें हें सरोवर जलपूर्ण असून सर्व पदार्थ ह्यांत प्रतिबिंबित झाल्यामुळें तें जलरहितच आहे!

कपिं०—होय! आणखी पहा!

श्लोक.

जे ऊठती जलतरंग तुषार वातें ॥
ते दाविती रुचिर इंद्र धनुष्प्रभेतें ॥
रक्षावयास सर हें रुचिरें धनुष्यें ॥
धाडी सुरेंद्र, सखया मजलागिं भासे ॥१॥

तशींच हीं सरोवरांत असंख्य अनेक रंगांचीं कमलें तरी किती रमणीय दिससात!

पुंड०—होय दुसरा चमत्कार पहा!

श्लोक.

याच्या रम्य तटीं तमाल रचना बिंबे जलाभ्यंतरीं ॥
शोभे वर्तुळ अंधकारमय हें जें या मनातें हरी ॥
द्वारें केवळ हीं रसातलपथा, विस्तीर्णशीं भासती ॥
रात्रीचा भ्रम चक्रवाक धरुनी नीलोत्पलांनां भिती ॥१॥

कपिं०—पहा येथें अनेक मुनिजनांचीं स्नानें होत आहेत! अशा जलाशयास समुद्राची उपमा कां शोभणार नाहीं! अहाहा! मला वाटतें या सिद्ध गंधर्वादिकांच्या स्नानसंध्यावंदनादिकानें पवित्र झालेल्या सरोवरांत स्नान करावें.

साकी.

नाना परिचीं रम्य वनें हीं लताकुंज पुलिनें हीं ॥
शिलातलें हीं विलासिनींचीं शिवमंदिर हें पाही ॥
देई आनंदा ॥ वंदूं प्रभुच्या पुण्यपदा ॥१॥

हें पहा मातड मंडळ!

श्लोक.

तेजें व्यापुनियां पहा दशदिशा व्योमीं झळाळे रवि ॥
जाणों रौप्यरसासि ओतुनि करी संतप्त सारी मही ॥
ज्वाळा सर्व दिशा मुखें वमुनिया विश्वा जणों जाळिती ॥
छायेमाजि बसोनि हंस हरिणें धापा पहा टाकिती ॥१॥

(जातात) (हा विष्कंभक झाला.)

(महाश्वेता गाते.)

महा० — पद. (जल भरन०)

अभिनव सुखकर सुंदर दिन हे वरिवरी देती आल्हादातें ॥धृ०॥
कमलवनें हीं फुल्ल जहालीं, सेविति मधुकर मकरंदातें ॥ अभिनव०॥
आम्रमंजरी परिमळ योगें हर्षचि होई या मदनातें ॥ अभिनव०॥
परमानंदें तरुणी करिती श्री मदनाच्या उत्साहातें ॥अभिनव०॥
कोमल किसलय, अभिनव कुसुमें, जोडी कुतुकें काम शरातें ॥अभि०॥
कामिजनांचा मित्र चैत्र हा दुःखद पारि हो विरहि जनांतें ॥अभि०॥१॥

अहाहा! किती हा रमणीय प्रदेश! इकडे हें अत्यंत मनोहर अच्छोद सरोवर! इकडे या शिलातलावर महादेवाचीं लिंगें! इकडे नानाविध पुष्पवृक्षांनीं सुशोभित लतामंडप! व त्या भोंवतीं मंजिरींनीं लवलेले अम्रवृक्ष, जेथें कोकिलांचे रम्य मनोहर शब्द होत आहेत. आणखी—

श्लोक.

येथें गळे तरुतलीं मकरंद त्यातें- ॥
जे लुब्ध हे भ्रमर गुंगति मोद चित्तें ॥
केकास्वनें भिऊनि चंदनवृक्षभागीं ॥
हे बैसले गुरु भुजंगम जागजागीं ॥१॥

तरलिके! ही किती शीतल, चंदन वृक्षांची झाडी आहे पाहिलीसना?

तरलिका —होय राजकुमारि!

महा० —आणखी—

साकी.

वनदेवीचे दिव्य लतांचे वृक्षांवारि झोपाळे ॥
लोंबति तैसे पराग रंजित भूवरि पाहे उठले ॥
पद हे हंसांचे ॥ रम्यचि वन हें गे साचें ॥१॥

अशा या रमणीय प्रदेशाचें अवलोकन करण्याची मनास केवढी उत्कंठा होते पण!

तर० —तर मग आपण हा अच्छोद प्रदेश पहात येथें फिरूं!

महा० —अहाहा! एकाएकीं असा अद्वितीय सुगंध कसा सुटला बरें!

अंजनी गीत.

रम्य वनांतिल या कुसुमांचा ॥ लोपे जेणें परिमळ साचा ॥
व्यापुनि गेला सर्व दिशांचा ॥ भागत्रि या गंधें ॥१॥

आणखी—

श्लोक.

हा दिव्य गंध नच योग्य मनुष्यलोकां ॥
घ्राणेन्द्रियासि परि हा सुख दे विलोका ॥
ऐसा विलक्षण सुगंध कुठोनि आला ॥
ज्याच्या सवें भ्रमत ये नव भृंगमाला ॥१॥

अहाहा! सखे अशा दिव्य गंधाचें मला मोठें कौतुक वाटतें! तर मी क्षणभर उभी राहून डोळे मिटून हा गंध घेत्यें.

तर०—या सुगंधानें देवीचें मन केवळ आकर्षित झालें!

महा०—बरें पण हा सुगंध आला कोठून?

तर०—तो पहा ऋषिकुमार अच्छोद सरोवरीं स्नानार्थ येत आहे, तिकडून हा आला! कायहो ही रूपातिशय निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाच्या कौशल्याची परिपूर्णता!

पद. (भला जन्म हा तुला)

अभिनव सुंदर रूप मनोहर नच ऐसें देखिलें ॥
धन्य हे नयन आजि जाहले ॥धृ०॥
दग्ध सख्या मदनाच्या दुःखें खिन्न मनें जी करी ॥
तपाही वसंत मूर्तिच खरी ॥
सकलकला परिपूर्ण मंडला व्रतनियमा जो धरी ॥
तोचि हा चंद्र शंभुच्या शिरीं ॥
किंवा शंकरपदप्रसादा तपासि जो आचरी ॥
तोचि हा मदन मनातें हरी ॥
सोज्वळ तेजें रूप रम्य हें दिसे ॥
कीं हा विद्युल्लतापंजरीं बसे ॥
कीं अग्निशिखचें स्वर्ण तेज हें असे ॥

जणों रूप वेष्टिलें असे हें सोज्वळ रविमंडळें ॥
धन्य हे नयन आजि जाहले ॥ अभिनव सुंदर०॥१॥

महा०—सखे तरलिके! मला वाटतें, ह्या ऋषिकुमाराच्या दीपप्रकाशाप्रमाणें प्रज्वलित अंगकांतीच्या योगानें हा वन प्रदेश सुवर्णमय झाला आहे!

तर०—यांत काय संशय!

महा०—किती मनोहर रूप हें!

श्लोक.

जाणों पिंगटवर्ण सुंदर जटा गोरोचनें रंगल्या ॥
भाळीं शोभतसे त्रिपुंड्र जणुं या गंगौघधारा भल्या ॥
सारेही मृगनेत्र एकवटुनी नेत्रांत या बिंबले ॥
जाणों भ्रुधनु मन्मथें श्रमुनियां या सुस्थळीं ठेविलें ॥

आणखी—

साकी.

सरस्वतीचा विलास अथवा पति सकलहि विद्यांचा ॥
अलंकार वा ब्रह्मकुलाचा जीवचि हा युवतीचा ॥
यौवन, धर्माचें ॥ संकेतस्थळ शास्त्रांचें ॥१॥

तर०—हें एक अद्वितीय मानवरत्नच भूमंडळावर अवतीर्ण झालें आहे!

महा०—तरलिके! ह्यानें आपल्या कर्णस्थळावर भूषणार्थ एक चमत्कारिक पुष्पमंजरी ठेविली आहे! अशी मंजरी म्यां कधींच पाहिली नव्हती!

दिंडी.

अन्य पुष्पांच्या रम्य सुगंधाचा ॥
मोड करुनी संचरे जगीं साचा ॥
सुखद जीचा सर्वत्र गंध आहे ॥
वसे कर्णीं मंजरी तीच पाहे ॥१॥

तर०—देवि, जोंपर्यंत तो त्या अच्छोद सरोवरीं आहे तोंपर्यंत

त्यास पाहून घे. कृष्णपक्षीं चंद्राच्या कला क्षीण होतात त्या सूर्य आकर्षण करितो, पण हें खोटें आहे! त्या कला या ऋषिपुत्राच्या शरिरांत प्रविष्ट होतात.

महा० —खरें आहे! असें न होतें तर ज्यांत क्लेश फार, अशा तपोनियमानें शुष्क होणाऱ्या शरिरांत ही लावण्य संपत्ति निर्विकार कधीं राहणार नाहीं!

तर० —खरें आहे!

महा० —तरलिके!

साकी.

मकरंद मदें भ्रमरी जैशी पराधीन गे होते ॥
गुण दोषातें न गणुनि तन्मय करितें रूपचि मातें ॥
गे या मदनानें ॥ होय पराधीनचि जाणें ॥१॥

सखे तरलिके! मदनानें हें फार अयोग्य कर्म केलें!

श्लोक.

झालें सर्वांग माझें अचल, मुनिसुतीं निश्चला दृष्टि माझी ॥
पाहे प्रेमें स्पृहेनें, शरणचि जणुं मी येतसें यासि आजी ॥
"कामार्ता रक्षिणें ही" ह्मणुनि, निजमुखें कन्यका सत्कुलाची ॥
लज्जेतें काय सोडूं? अनुचित कृति ही या कुमारीस साची ॥१॥

असें जाणत असून ही मी इंद्रियांस स्वाधीन ठेवण्यास असमर्थ झाल्यें!

साकी.

चित्तें, मदनें, तारुण्यें, वा अनुरागानें मातें ॥
किंवा रूपें, मुनिपुत्राच्या केलें उपदेशातें ॥
नकळे हें मजला ॥ लोटूं न शकें प्रेमाला ॥१॥

तर० —देवि! पहा! एकाएकीं ह्या मुनिपुत्राच्या दर्शनानें तुझी विलक्षण स्थिति झाली.

श्लोक.

अधर थरथरे हें रम्य सर्वांग कांपे ॥
पुलकित मुख शोभे मन्मथाच्या प्रतापें ॥

तव हृदय जणों हें सानुरागें उडालें ॥
मुनिसुततनुच्या या दिव्य तेजीं मिळालें ॥१॥

महा०—तरलिके! स्त्री जनांचीं हृदयें अत्यंत मूढ आहेत. यांस कार्याकार्य विचार नाहीं! पहा!—

श्लोक.

कोठें सुंदर दिव्य तेज मुनिचें पुण्यांश जेथें जडे! ॥
कोठें मन्मथ चेष्टितें! दिसतिं जीं हीं क्षुद्र त्यांच्यापुढें ॥
जाणें, देइल शाप हा! करुनिया निर्भर्त्सना हो! तरी- ॥
वाढे कामविकार हा वरिवरि जो संचरे अंतरीं ॥२॥

तर०—देवि, पूर्वीं कित्येक कन्यका लज्जा सोडून आपण होऊन दयिताकडे गेल्या आहेत! व कित्येक दुर्विनीत मदनानें उन्मत्तावस्थेंत पावविल्या आहेत!

महा०—तरलिके! माझें अंतःकरण ह्या क्षणीं ह्या ऋषिकुमाराच्या दर्शनानें अत्यंत व्याकुळ झालें आहे! कामविकार दुर्निवार आहे! तर जोंपर्यंत त्यानें माझें दुश्चेष्टित पाहिलें नाहीं, तोंपर्यंत येथूत निघून जावें हें बरें. नाहींपेक्षां, हा माझें चेष्टित पाहून कुपित होत्साता शाप देईल! तर मी आपली त्याकडे गेलेली दृष्टि आवरून त्यास नम्रपणें वंदन करित्यें!

(जाऊन नमस्कार करते.)

तर०—काय चमत्कार झाला हा!

साकी.

एकाएकीं चंचल होतो पवनें दीपक जैसा ॥
देखतांचि तुज चंचल झाला हा मुनिपुंगव तैसा ॥
यौवन रूपाचा ॥ धन्यचि हा जोडा साचा ॥१॥

समय तरी किती रमणीय आहे! काम सम्मर्दाचा उत्पादक हा चैत्रमास! रम्य वनराजी! कुसुमित लता मंडपांतीं मनोरम सौरभ! अशा स्थळीं दुर्निवार विषयाभिलाष अशा रूपसंपन्न चारुतनूच्या ठायीं कसा संभवणार नाहीं! तस्मात् कामदेवाची आज्ञा उल्लंघन करण्यास कोण समर्थ आहे! देवि! पहा पहा!

साकी.

काम शरीरीं याच्या शिरतां रोमांचित तें झालें ॥
घर्मजलें हें भिजुनी सहजचि तेणें कंपा वरिलें ॥
माला स्फटिकाची ॥ झाली करभ्रष्ट साची ॥१॥

पुंडरीक – (मनांत)

साकी.

मदन मिषें या सुंदरिचा हा अनुरागचि मम हृदयीं ॥
संचरुनीयां हिच्या दर्शनें आनंदाचि मज होई ॥
वाटे ही कन्या ॥ लोकीं निजरूपें धन्या ॥१॥

महा०–(कपिंजलास प्रणाम करून) भगवन् हा कोणत्या ऋषीचा-पुत्र! याचें नांव काय व ही अत्यंत मनोहर व सुगंधी अशी पुष्पमंजरी कोणत्या वृक्षाची!

कपिं०– (सहास्य) बाले तूं कशाला पुसतेस? अथवा तुला ऐकण्याचें कौतुक असेल तर सांगतों लक्ष्य दे.

महा०–माझें लक्ष्य आहे.

कपिं०–ज्याचें तप मोठें असा पुराणमुनि जो श्वेतकेतु तो याचा पिता. हा मुनि—

पद. (अभाग्याच्या घरीं बाबा०)

आनंदस्थळ, रूप जयाचें, त्रिभुवन रमणीचें ॥
लोकोत्तर सौंदर्यें उतरीं पाणी मदनाचें ॥
एके दिवशीं पंकज हरणा हा गंगा स्त्रोतीं- ॥
उतरे, तेथें भुवन सुंदरी श्री लक्ष्मी होती ॥
अभिनव मुनिच्या रूपें व्याकुळ झाली मदनें ती ॥
दर्शन मात्रें संगमसुख हो तिस लाधे साचें ॥आनंद०॥१॥

महा०–असें, एकूण लक्ष्मीचें आनंदकारक पुत्ररत्न हें! बरें ही मंजरी यास कोठून मिळाली?

कपिं०–हा नंदनवनाजवळून जात असतां एक वनदेवता प्रेमानें ही पारिजात मंजरी घेऊन आली आणि प्रणाम करून यास ह्मणाली:—

श्लोक.

श्री पारिजात तरुची नव मंजरी हे ॥
ऐशा सुरम्य तनुला बहु योग्य आहे ॥
कर्णस्थळीं ह्मणुनिया धरुनी तरूचा ॥
आर्या करा सफल जन्म सदैव साचा ॥१॥

महा०—धन्य ती वनदेवता! व धन्य ही मंजरी!

कपिं०—असें ती बोलत आहे तों हा माझा मित्र आपल्या रूपस्तुतीचें भाषण ऐकून लज्जित होत्साता खालीं दृष्टि करून ती पुष्पमंजरी न घेतां तसाच चालला!

तर०—केवढा थोरपणा हा!

कपिं०—मग मी ह्मणालों सख्या या वनदेवतेच्या प्रीतिदानाचा स्वीकार करण्यास काय दोष आहे? व मी बळेंच ती मंजरी घेऊन याच्या कर्णावर ठेविली!

पुंड०—हे कौतुकवती, या प्रश्नाचा वृथा आयास कशास करतेस? जर हिचा सुगंध तुला प्रिय असेल तर ही मी तुझ्या कर्णस्थळावर ठेवितों.

कपिं० काय चमत्कार पहा!

साकी.

स्पर्शे* मुनिचा करतल हीच्या कोमल कपोल भागीं ॥
सुख लोभानें हृदय सरुनियां हर्ष भरे सर्वांगीं ॥
मोहित हा झाला ॥ अनुभवुनी त्या स्पर्शाला ॥१॥

व मदनव्यथेनें ह्याच्या हाताचीं बोटें कंपित होऊन अक्षमाला लज्जेसह खालीं गळाली ती ही यानें जाणिली नाहीं!

महा०—तरलिके ही अरसिक माला त्या कुमाराच्या सेवेपासून जरी भ्रष्ट झाली, तरी पण त्याच्या करस्पर्शामुळें ती मला फार प्रिय होते! ह्मणून मी त्याच्या आलिंगनसुखाचा अनुभव घेण्यासाठींच आपल्या कंठांत कौतुकानें घालत्यें!

तर०—देवि राणीचें स्नान होऊन शिवपूजेची वेळ झाली! चल!

---

* स्पर्श करी.

महा०—किती गे तूं निर्दय आहेस!

श्लोक.

लावण्यामृतमग्न चित्त मम हें कामाचिया पंजरीं ॥
गुंते, दृष्टि सख्याचिया पुलकिता रम्या कपोलावरी ॥
गोंवे, रूपगुणांत जों मन तुवां आकर्षिलें हें अहा! ॥
जाणों मत्त करेणु अंकुश बळें आकर्षिली तूं पहा! ॥१॥

(जाऊं लागते)

पुंडरीक—

साकी.

जाणों माझें हृदयचि पिळुनी नृपकन्या ही जाते ॥
अथवा माझें जीवन तनुतुनि ओढुनि काढुनि नेते ॥
माझ्या धैर्याचा ॥ पर्वत ढांसळला साचा ॥१॥

कपिं०—सख्या पुंडरिका! प्राकृतजनांप्रमाणें या मार्गाचा अवलंब करणें तुला योग्य नाहीं! साधु पुरुषाचें धैर्य हेंच धन आहे! तुझ्या इंद्रियांस हा अपूर्व विकार कोठून प्राप्त झाला! तुझी शांतवृत्ति कोठें गेली!

दिंडी.

तपानें जें त्वां ज्ञान जोडियेलें ॥
जयें अन्यातें मोक्षपदा नेलें ॥
तेंचि आतां मदनासि बळी देशी ॥
वृथा लोकीं उपहास पात्र होशी! ॥१॥

अरे कुलक्रमानें प्राप्त झालेलें तुझें ब्रह्मचर्य कोठें गेलें! गुरुजनांच्या उपदेशाची आठवण कर! धर्मशास्त्राचा उपदेश फुकट गेला नां! अरे तुझ्या हातांतील अक्षमाला गळून पडली! आणि ती तिनें नेली हें देखील तुला समजलें नाहीं! हें मोठें आश्चर्य आहे. माला तर नेलीच! पण तुझें हृदय ही त्याच स्त्रीनें हिरावून चालविलें आहे! तें तरी आवरून धर!

पुंड०—सख्या! मजविषयीं तूं भलतीच कल्पना कां करतोस? त्या दांडग्या पोरीचा प्रमाद मी सहन करणार नाहीं! (महाश्वेतेस) हे चंचल स्वभाव माझी अक्षमाला दिल्यावांचून जाशील तर खबरदार!

महा० —अहो आर्य! ही आपली अक्षमाला!

(आपल्या गळ्यांतील मोत्यांची माळ देते.)

दिंडी.

नदी नैशी रोधोनि बळें न्यावी ॥
मला तैशा ओढिती सख्या बाई! ॥
हृदय उत्कंठित येथ खिळुनी राही ॥
दुःख शोकें होईन दीन पाही! ॥१॥

(जाते.)

कपिं० —सख्या पुंडरिका! अरे! तुझी ती गंभीर धीर, व अस्खलित चित्तवृत्ति एकाएकीं चंचल कशी झाली! ही मंददृष्टि, हे अश्रुपूर, हा हनुकंप, हीं लक्षणें त्या दुष्ट मदनाचीं होत! अरे! जें परिणामीं दुःखप्रद, असें नीचकर्म तुझ्या सारख्या थोर पुरुषास शोभत नाहीं!

पुंड० —सख्या कपिंजला!

साकी.

जों मदनाचे बाण विषारी नच तुजवरि बा पडले ॥
तोंवरि शुष्क ज्ञान तुझें हें उपदेशक्षम झालें ॥
नलगे तें मजला ॥ दावी त्या मुखचंद्राला! ॥१॥

सख्या कपिंजला तुला फार काय सागूं? ज्याला इंद्रियें असतील, किंवा ज्याला मन असेल, ज्याला सदसद्विचार असेल, त्याला तुझा उपदेश योग्य आहे! स्थैर्य, धैर्य, ज्ञान, विग्रह, ही कथाच राहिली! तूं पहातोस नां! या मदनानें माझें सर्व शरीर संतप्त केलें आहे!

कपिं० —अरे मदन ह्मणजे पदार्थ काय? ज्यानें मनोनिग्रह केला त्याला असाध्य काय आहे!

पद. (गावीं संत चरित्रें हो०)

क्षुब्ध मनातें तूं आवरी ॥ मग तो मन्मथ काय करी ॥ धृ०॥
ब्रह्मज्ञा तूं समजुनि उमजुनि आडमार्ग हा धरिला ॥
विषवृक्षाचा छेद न करितां वाढविशी तूं त्याला ॥ क्षुब्ध० ॥

महारत्न तूं समजुनि अग्निच कैसा पदरीं घेशी ॥
धैर्य त्यजित्या दुष्टा मदना वश त्यातें कां होशी ॥ क्षुब्ध० ॥१॥

पुंड०—वयस्या!

अंजनी गीत.

ब्रह्मांडीं ती बिंबे दयिता ॥ तन्मय झालें जग मज आतां ॥
बाणापरि हें तव वच चित्ता ॥ लागे हें सखया ॥१॥

आणखी—

श्लोक.

जया मार्गें गेली निघुनि मम ती प्राण रमणी ॥
गमे रत्नज्योतीहुनि विमल ती पादसरणी ॥
भरे त्या मार्गीं हा अमृतरस जो चंद्र ह्मणवी ॥
तिच्या अंगस्पर्शें सुरभि! मज हा वात सुखवी ॥१॥

शुद्रक **क्षुद्रक**—खरोखर हें नाटक म्यां पूर्वीं कधीं पाहिलें असावें असा मला भास होतो!

कपिं०—अहो! केवढें या कामीजनांचे विलक्षण प्रेम! आतां यास उपदेश करणें व्यर्थ आहे! आतां ह्याच्या प्राणरक्षणाविषयीं प्रयत्न करावा. वयस्या!

श्लोक.

शय्या पुष्पमयी शिलातलवटीं केली लतामंडपीं ॥
येणें ताप शमेल अल्प, न शमे निःशेष तो यद्यपि ॥
अंगीं चंदन बालपल्लवरस, प्रेमें तुझ्या लावुनी ॥
वारा घालिन केतकी नवदलें संताप जाया ह्मणी ॥१॥

आणखी—

धारागृहापरि तुषार सरस्तटाकीं ॥
आहेत तोषकर हे विरही जनां कीं ॥
झाडी असे रुचिर कोमल पल्लवांची ॥
मंदानिल व्यजनता तिस देइ साची ॥१॥

अरे! हा तर कामव्यथेनें अत्यंत व्याकुळ होऊं लागला! आतां कालातिक्रम करण्याची वेळ नव्हे! कसेंही करून याच्या प्राणरमणीचा प्रसाद

जेणेंकरून ह्याच्यावर होईल अशी तजवीज केली पाहिजे! मित्रप्रेमार्थ दूतभावानें त्या गंधर्वराजकन्येची भेट घेतलीच पाहिजे! ह्याचें अनुमोदन घ्यावें, तर तो लज्जेस्तव माझा प्रतिकार करील! तर कांहीं तरी मिष करून तिकडे गेलें पाहिजे! वयस्या! चल क्षणभर अच्छोद सरस्तटाकीं रम्य शीतल वनराजींतील लतागृहांत बसून अंमळ बरें वाटेल तर पहा!

(पुंडरीक जातो.)

कपिं०—(इकडे तिकडे पाहून) ही पहा गंधर्वराजकन्या विरहातुर होत्साती रमणीय मालती लतामंडपांत शिलातलावर पल्लवशय्येवर पडली आहे! चलातर तिकडेच जावें. (जातो)

(विरहिणी महाश्वेता सखीसह येते)

कादंबरी—सखे महाश्वेते! हीं मृणालवलयें व मृणालमाला परिधान कर! हा मी शीत व सुगंधी चंदनरस तुझ्या अंगाला लावून कर्पूरचूर्ण त्यावर टाकित्यें. या योगानें तुझा संताप कमी होईल.

क्षुद्रक— **साकी.**

स्वप्नीं किंवा जन्मान्तरिं मज दर्शन घडलें हीचें ॥
हेंचि कळेना नामरूपही स्मरे न मज दयितेचें ॥
भ्रमलों मी पाहे ॥ हृदयीं प्रेमचि तें राहे ॥१॥

तरलिका—देवि! ह्या कदलीपत्रानें मी वारा घालत्यें, यापासून तुला कांहीं बरें वाटतें कां?

महा०—तरलिके कशाला श्रम करतेस! कादंबरि तुझांस वृथा आयास मात्र होतात! माझा संताप तर वाढत चालला आहे.

कादं०—बरें, तुला आपल्या प्रियाची कथा सांगण्याचें कौतुक वाटून तुझ्या मनाचें रंजन होतें, तर ती कथा अर्धीच सांगितलीस ती पुढें सांगतेस ना?

महा०—त्या ऋषिकुमाराचें चिंतन करीत मी आईबरोबर घरीं आल्यें आणि कन्यान्तःपुरांत म्यां प्रवेश केला! त्या वेळेपासून मी विरहातुर झाल्यें. त्या समयीं मला भान ह्मणून राहिलें नाहीं!

कादं०—पुढें?

महा०—मी कोठें जात आहें! काय करीत आहें! हें माझें मलाच कळेना! मग मी एकटीच सर्व व्यापार सोडून अंतःपुराच्या प्रासादावर आरोहण करून मणिमय गवाक्षांतून ज्या दिशेला तो कुमार होता, त्या दिशेकडे पाहूं लागलें.

कादं०—पुढें?

महा०—मला वाटलें, ती दिशा त्या प्रियजनाच्या चरणधूलीनें आलंकृत झाली आहे, अथवा प्रफुल्लित झाली आहे, किंवा असंख्य रत्नांनीं अधिष्ठित झाली आहे! फार काय सांगूं? ती चंद्रोदयानें प्रसन्न होऊन केवळ अमृतरसानें भरून उरली आहे असें मला वाटलें, आणि त्या दिशेकडून येणाऱ्या वायूस, पक्ष्यांस व सुगंधास त्या कुमाराची वार्ता पुसावी अशी मला इच्छा झाली!

कादं०—केवढा विलक्षण मनोरथ हा! पुढें?

महा०—प्रेमभावानें त्या ऋषिकुमाराचा पक्षपात होऊन मनांत असें आलें कीं,—

श्लोक.

तपःक्लेशासंगें प्रियाचि मुनिचा वेष गमला ॥
धरी तारुण्या तो, प्रिय ह्मणुनि तें होय मजला ॥
तयाचा तो वाटे प्रियाचि सुरलोक प्रियतमे ॥
मला धन्या गे ती श्रवण सुभगा मंजरि गमे ॥१॥

कादं०—पुढें?

महा०—

श्लोक.

दूरस्था नलिनी रवीस, अथवा चंद्रास वेला जशी ॥
मेघालागिं जशी मयूरतनया! त्या सुंदरा मी तशी ॥
झाल्यें गे विरहातुरा अभिमुखा होवोनियां त्या क्षणीं ॥
रक्षा जीवनदा गळां वरियली ही अक्षमाला[1] ह्मणी ॥१॥

त्याचप्रमाणें ती पारिजातमंजरी जशीं त्याच्या गुजगोष्टी सांगावयासच कानाशीं लागली आहे असें वाटे.

कादं०—पुढें?

---

१ भालदोरी.

महा०—तिच्या योगानें, व त्याचा हस्तस्पर्श झाल्यामुळें जें सुख झालें त्या योगानें अंगावर रोमांच उठले! अशी होत्साती मी त्या दिशेकडे दृष्टि लावून निश्चळ उभी राहिल्यें!

कादं०—सखे महाश्वेते, तूं चिंता करूं नको. तुझ्याप्रमाणें ऋषिकुमारही व्याकुळ झाला आहे! व तरलिकेनें तुला समक्ष सांगितलेंच आहे कीं, त्यानें मोठ्या कौतुकानें तुजविषयीं चौकशी केली! व तिच्या बरोबर तुला एक पत्रही दिलें!

महा०—गडे कादंबरि! तें मोह उत्पन्न करणारें असें प्रियाचें पत्र आणखी एकवार वाच बरें!

कादं०—वाचते. **साकी.**

बिस सित हारें लोभुनि मानस-जन्मा जैसा गेला ॥
त्या परि माझा मानस जन्मा तुवां हरुनियां नेला ॥
चिंताही जडली ॥ सुतनू व्याकुळ ही झाली ॥१॥

महा०—सखे! या शब्दांनीं मला पिशाचग्रस्ताप्रमाणें विवशकरून व्याकुळ केलें! माझी तरलिका मोठी भाग्याची! (तिच्या गालाला व केशाला स्पर्शकरून) तरलिके! ऋषिकुमाराचें तुला पुनः दर्शन झालें! व त्याशीं तुवां भाषण केलें! केवढी तूं धन्या! सखि सांग बरें, तो तुला काय ह्मणाला! तूं त्याजपाशीं किती वेळ होतीस! मी तुला वेड्यासारिखी पुनः पुनः विचारितें! पण काय करूं! त्याचे ते शब्द माझ्या कर्णास फारच मधुर लागतात!

कादं०—महाश्वेते! तुझ्या अनुरागानेंच आरक्त झालेला हा सूर्य पहा अस्तास जात आहे!

श्लोक.

प्रेमानुरक्त रविचा अनुराग लाहे ॥
ही पश्चिमा दिसतसे रमणीय पाहे ॥
जों जों त्यजोनि गगना रवि जात आहे ॥
तों तों सुरम्य सुषमा ह्मणि जाउं पाहे ॥१॥

अथवा—

सूर्याचें गुरु तेज सर्व हरिती पुण्यें मुनींद्र स्वयें ॥
झालें क्षीणचि रश्मिजाल ह्मणुनी हा चालला निश्चयें ॥
किंवा जें उदयास येइल अशा सप्तर्षिच्या मंडला ॥
होवो ताप न सूर्य यास्तव जणों आधींच हा चालला ॥१॥

द्वारपालिका—देवि! कोणी ऋषिकुमार आला आहे!

महा०—मग त्याला आंत कां येऊं देत नाहींस!

कादं०—सखे महाश्वेते! रूपानुरूप यौवन! यौवनानुरूप मदन! मदनानुरूप वसंत! व वसंतानुरूप जसा दक्षिणवात! तसा त्या ऋषिकुमारानुरूप त्याचा सखा कपिंजल येत आहे!

महा०—(उठते.)

कादं०—नको नको सखे, आयास करूं नको! आह्मीच त्याची पादप्रक्षालनादि सेवा करूं!

महा०—छेछे! माझ्या प्रियाचा सखा तो. त्यास आदरपूर्वक प्रणाम करून मी त्याचें पादप्रक्षालन करितें, व ते आपल्या उत्तरीयाच्या पदरानें पुशितें. (कपिंजल येतो.)

कपिं०—(महाश्वेतेकडे पहातो.)

महा०—हे भगवन् ही माझी सखी कादंबरी माझ्या शरीराहून निराळी नाहीं! आपणास काय बोलावयाचें असेल तें निःशंक बोलावें.

कपिं०—हे राजपुत्रि! काय बोलूं! माझी वाणी लज्जेमुळें स्खलन पावते पहा!

साकी.

पवित्र मुनितें उपहासास्पद चेष्टित त्या मदनाचें ॥
प्रिय व्हावें! म्यां अवलंबावें दूतत्व! कसें त्याचें! ॥
मित्र स्नेहानें ॥ आणियलें येथें जाणें ॥१॥

महा०—भगवन् आपली मधुरवाणी अमृतस्रावी आहे असें मला वाटतें!

कपिं०—देवीच्या प्रेमळ भाषणानें माझ्या मनास धीर आला! देवि! तुझ्या समक्षच म्यां निषेधपर भाषण करून, या नीच वृत्तीपासून

मित्रास पराङ्मुख होण्याविषयीं उपदेश केला! यावर तो चिरकाल मिटलेले! रोदनामुळें आरक्त! व अश्रुपूर्ण असे नेत्र मोठ्या कष्टानें उघडून मंद दृष्टीनें फार वेळ मजकडे पाहून दीर्घ सुस्कारा टाकून लज्जेमुळें अडखळत, अडखळत ह्मणाला! "वयस्या सर्व प्रकार तुला माहित आहे, असें असून मला काय पुसतोस?" यावर म्यां बहुतप्रकारें उपदेश केला! शास्त्रें पुराणें ह्यांतील अनेक दाखले दिले! परंतु त्या कामानें, अगाध गांभीर्याचा सागर असा माझा सखा पुंडरीक क्षणांत तृणबिंदुवत् लघुत्वास आणिला! तेव्हा म्यां केवळ त्याच्या जीवित संरणार्थ या निंद्य वृत्तीचें अवलंबन करून, येथवर येऊन, त्याची अवस्था तुला निवेदन केली आहे! या उप्पर जें अवसर प्राप्त! जें अशा प्रेमास योग्य! जें माझ्या आगमनास अनुरूप! जें आपणांस उचित! तें करण्याविषयीं तूं समर्थ आहेस!

(पडद्यांत) वत्से महाश्वेते!

तरलिका—भृतदारिके तुझी माता येत आहेसें वाटतें.

कपिं०—हे राजपुत्रि! हा मोठाच कालातिक्रम झाला! व सूर्य ही अस्ताचलास चालला तर मीं जातों. तूं आपल्या इष्टजनाच्या प्राणाचें रक्षण कर! हीच दाक्षिणा मागावयाकरितां मीं हा अंजलि जोडिला आहे! हीच माझी संभावना कर! (जातो.)

महा०—**पद.** (मझ्या मनिची हौस० या चालीवर.)

सुखामृताच्या डोहीं सखये मग्नचि मी झाल्यें ॥
प्रीतिरसाच्या क्षीरसागरीं पोहाया लागलें ॥ धृ० ॥
आनंदाच्या गिरिच्या शिखरीं बाई मीं बसल्यें ॥
मनोरथाच्या वृक्षाग्रावरि मोदें मी चढल्यें ॥
उत्साहाच्या शय्येवरि मी आनंदें निजल्यें ॥
आनंदाश्रु प्रेमें नेत्रांतुनि वाहू लागले ॥ सुखा० ॥१॥

सखे कादंबरि! माझ्याप्रमाणें मदनानें त्यालाही व्याकुळ केलें! तर खरेंच यानें मला संताप देत असतांही अनुकूलत्व दाखविलें. अशा प्रसंगीं म्यां काय उत्तर द्यावें? त्याची खरीच अशी प्रीति असेल तर त्यानें माझ्यावर मोठा उपकार केला! मी तर या समयीं मूढ झाल्यें तूंच मला उपदेश कर!

साकी.

पति नलिनीचा मित्रचि अथवा चक्रवाक पक्ष्यांचा ॥
नाथ मित्र त्यासह जातां ये अंधारचि गे साचा ॥
उत्कंठित हृदया ॥ वरि वरि आशा गे वाया ॥१॥

तरलिके! माझें हृदय अत्यंत व्याकुळ झालें आहे! इंद्रियें विव्हळ झालीं आहेत! तुझ्या समक्षच कपिंजल काय बोलून गेला हें त्वां ऐकलेंच! जर मी इतर कन्येंप्रमाणें लज्जा व धैर्य सोडून, सदाचाराचा अतिक्रम करून, कुलाची अवगणना करून, विषयांध होऊन, त्यास वरीन! तर वडिलांचा अपमान होऊन अधर्म घडेल! बरें त्याकडे न जातां मृत्यूचा स्वीकार करावा! तर ऋषिवर्य कपिंजल याचा मनोभंग होऊन कालातिक्रमामुळें, सख्या पुंडरीकाचा विपरीत परिणाम होईल! तर सांग बरें या समयीं म्यां काय करावें तें!

तर०– देवि! महाश्वेते! आतां लज्जा सोड! गुरुजनांची कशाला अपेक्षा करतेस? प्रसन्न हो! व तूं स्वतः त्या उदार कुमाराकडे जा!

साकी.

चंद्रोदयें समुद्रा भर ये तैसा भर मदनाचा ॥
व्याकुळ तुजला करितो आतां कालातिक्रम कैंचा ॥
वाटे भय मातें ॥ जाळिल मदन बाइ तूंतें ॥१॥

महा०–अगे या मदनानें अधीक तें काय करावयाचें आहे?

दिंडी.

चंद्रदर्शन होतांचि सखे पाहीं ॥
उरीं मदनाचा लोळ पेट घेई ॥
मलय मारुत! मधुमास! अंगराग! ॥
काय गे हीं करितील येथ सांग ॥१॥

आणखी—

श्लोक.

जेणें सर्व विकार दूर करुनी लज्जा नसे रक्षिली ॥
विघ्नें जाळुनियां, विचार गिळुनी शंका न ती ठेविली ॥

कार्याकार्य विचारशून्य करि जो तो चंद्रमा या जनां ॥
माराया सजला ह्मणूनि नयनें पाहूं तया सज्जना ॥१॥

तर चल! त्या हृदयप्रियजनाची भेट घेऊं!

कादं०—सखे तुला शक्ति नाहीं! तर चल आह्मी तुला साह्य करितों.

महा०—छे छे!

श्लोक.

हा कामदेव सखये मज साह्य आहे ॥
केलें तयें रुचिर सज्ज धनुष्य पाहे ॥
आकर्षितो निजकरें मज चंद्रमा हा! ॥
ओढुनि ने हृदय, लोभ, जवेंचि देहा ॥१॥

सखे कादंबरि, हा चंद्रमा माझ्या प्रियाला आकर्षून माझ्या अभिमुख आणील काय?

कादं०—तूं काय वेडी आहेस? चंद्राला त्या जनाचा काय उपयोग! हा स्वतःच कामचेष्टा करीत आहे पहा!

पद.

(हंसणें बसणें बोलणें चालणें मिजासिगखालीं, ही चाल.)

तुझ्या कपोलीं घर्मजलीं हे प्रतिबिंबित झाले सखये गे ॥ प्रति०॥
कर चंद्राचे वाटे तेणें चुंबन गे केलें ॥
शुभ्र करीं हा उरस्थळातें स्पर्श करी रशनेतें ॥ सखेगे स्पर्श० ॥
पद नखरीं हा बिंबुनि वाटे वंदी चरणातें ॥१॥

हे विलासिनि! तुवां आज तांबूल, चंदन, पुष्पमाला, वगैरे विलासाचें सामान घेतलेंस, परंतु तुझा अभिसरण वेष विलक्षणच आहे!

दिंडी.

कर्णभूषण मंजरी मात्र आहे! ॥
अक्षमाला कायती गळां पाहे! ॥
आवडे हा मुनिवेष त्या प्रियातें ॥
प्रियत्रि कुसुमालंकार ह्मणुनि तूंतें ॥१॥

महा०—अग आईग!

कादं०—सखे महाश्वेते! काय झालें!

महा०—अगे! माझा हा उजवा डोळा लवतो!

कादं०—इडापिडा टळो अमंगळ पळो! आर्ये भिऊं नको! धीर धर! हा पहा तुझ्या प्रियाचा वनप्रदेश सन्निध आला आहे!

श्लोक.

झाडी उंच दिसोनि, थोर सुषमा अच्छोद भागीं दिसे ॥
तैंसे नील तमाल पल्लवभरें हा गंध गे येतसे ॥
नाना रम्य लतागृहें सुरुचिरें, हीं इंदिरा मंदिरें ॥
तैशी चंदनगंधलोलुप सखे ही भृंगमाला फिरे ॥१॥

आणखी—

नाना सुरम्य दिसती कदलीवनें हीं! ॥
दे वायु जेथ सुख कोमल पल्लवाहीं ॥
झालीं प्रफुल्ल कुमुदें बघ चंद्रिकेनें ॥
ऐशा स्थळीं तळमळे तवनाथ जाणे ॥१॥

(पडद्यांत) हाय हाय! काय हें अकस्मात संकट आलें! दुरात्म्या मदना! निर्दया! कायरे हें केलेंस त्वां!

महा०—सखे कादंबरि!

साकी.

हृदय विदारण झालें माझें करुणवचें या बाई ॥
अनर्थ दिसतो! हर हर! आर्ये! गोष्ट न बरवी पाही ॥
थरथर तनु कांपे ॥ फळलीं माझीं हीं पापें ॥१॥

(पडद्यांत) अरे पाप्या चांडाळा चंद्रा! कृतार्थ झालास ना! अरे दुष्टा दक्षिण वायो! तुझे मनोरथ तृप्त झाले ना! आतां खुशाल व्हा!

महा०—आर्ये कादंबरि! माझे प्राण जाऊं पाहतात!

(पडद्यांत) सख्या पुंडरीका ऊठ लौकर! तुजकरितां मी दुःखित आहें! अरे तुझें सुहृत् प्रेम कोठें गेलें! मला सोडून कसा चाललास! हा पहा मी येतों. सख्या!—

श्लोक.

झाली आज सरस्वती तुजविना वैधव्य दुःखाकुला ॥
झाला शून्यचि देवलोक! भुवनीं सद्धर्म हा लोपला! ॥
झालें सत्रप हें निराश्रित! तसें लावण्य गेलें लया ॥
झाले सद्गुण नष्ट! बा दशदिशा शून्या दिसों लागल्या ॥१॥

सख्या पुंडरीका! आतां कोणाबरोबर मी परिभ्रमण करूं? कोणाशीं बोलूं! ये लौकर! तुजकरितां मी विलाप करीत आहें! तुझें तें सस्मित भाषण कोठें गेलें!

महा०—हरहर! हा पुंडरीक! हा हृदय वल्लभ!

कादं०—अगे धीरधर! या उंच सखल भागाकडे न पाहतां धांवतेस! पडशील! हें पहा तुझें उत्तरीयवस्त्र सरस्तीरावरील वृक्षास अडकून फाटलें देखील! हरहर काय अनर्थ हा!

श्लोक.

शय्या पुष्प, मृणाल, पल्लवयुता केली लतामंदिरीं ॥
येथें सुंदर चंद्रकांत धवला रम्या शिलेच्या वरी ॥
जाणों निद्रित, मूर्च्छित, स्वनियमें, किंवा समाधिस्थ हा! ॥
दुर्दैवें सखिच्या पहा निजविला संयोगकालीं अहा! ॥१॥

महा०—हा पुंडरीक! (मूर्च्छित होते)

कादं०—आर्ये महाश्वेते! सावध हो सावध हो!

साकी.

प्राण, सखीचे जातिल वाटे निश्चेष्टित ही पडली! ॥
विपरित ऐशी दैवगती ही हरहर कैशी फिरली! ॥
सागर करुणेचा ॥ गेला खवळुनि हा साचा ॥१॥

हरहर! शोकाग्नीनें ही दग्ध होऊन गेली!

महा०—(सावध होऊन) हा सख्या पुंडरीका!

श्लोक.

अहा! काळें नेलें हरुनि तव हें जीवित तरी ॥
कशी माझी काया अझुनि उरली या क्षितिवरी ॥

कसा जाशी मातें त्यजुनि दयिता स्वर्गभुवना ॥
जगीं प्राणाधारा, तुजविण दुजा कोण सुजना ॥१॥

कादं०—हरहर! सखीचा दुर्धर शोकाग्नि प्रदीप्त होऊन अनर्थ होण्याची वेळ आली!

महा०—सख्या! तुजकरितां मी दिवस ही सहस्र युगांप्रमाणें घालविला! ह्या सखीला विचार! आतां प्रसन्न हो! आणि एकदां तरी माझ्याशीं भाषण कर! व आपली भक्तवत्सलता दाखीव!

श्लोक.

अनाथा मी नाथा! तव चरण आधार मजला!
दयासिंधो जाणें त्यजुनि मज, कां योग्य तुजला ॥
सख्या घाली माझ्या कथुनि मज, अन्याय, पदरीं ॥
त्यजी कोप प्रेमें, वद वद सख्या मौन न धरी ॥१॥

कारणावांचून टाकून जाण्यास लोकापवादास भीत नाहींस! अथवा!

श्लोक.

मिथ्यानुराग तुज दाउनि वंचियेलें ॥
येणेचि मी अहह! पातक घोर केलें ॥
आर्या मदर्थ परि सोडुनि देह जासी ॥
हें शल्य हाय हृदयास सदैव जाची ॥१॥

(मूर्च्छा पावते)

कादं०—सखे महाश्वेते! तुझें दुःख पाहून माझें मन अत्यंत खिन्न होतें! यासाठीं कष्टानें कसे तरी धारण केलेले प्राण या दुर्धर शोकाग्नींत जाळून टाकण्यास तूं योग्य नाहींस! हायहाय! ही मला उत्तर देखील देत नाहीं!

महा०—सख्या! माझ्या सारखी क्रूर अंतःकरणाची कोणी नाहीं! म्यां तुला सोडून घरीं कां बरें जावें?

श्लोक.

अहो या गेहाचें मजशिं नवतें कारण पहा! ॥
कशाला मीं गेलें त्यजुनि दयिता त्या क्षणिं अहा! ॥

अहो! माता! ताता! परिजनगणां! काय करुं मीं! ॥
बुडाल्यें शोकाच्या, तुजविण सख्या दुर्धर तमीं ॥१॥

हायहाय! आतां मीं कोणाला शरण जाऊं?

अहो! या दैवानें हरुनि दयिता शोक दिधला! ॥
अहो! कैचें सौख्य प्रणय विभवें या वरि मला! ॥
अहो! जाळी मातें वरिवरि जरी शोक सरणीं ॥
अहो! राहे कैसें! कठिण उर संतप्त अजुनी! ॥२॥

सखे कादंबरि! आतां मी काय करूं? कोणास शरण जाऊं? हे वन देवतानों! तुह्मी तरी प्रसन्न होऊन मला पतिदान द्या! माते पृथ्वि, आतां तूं दया करून मला आपल्या उदरीं घे! हे कैलासा! आतां तूंच मजवर दया करण्यास समर्थ आहेस!

कादं० —काय ही भूतग्रस्ताप्रमाणें बडबडूं लागली!

महा० —या मृतशरीराबरोबर मी सहगमन करीन! प्रिया! म्या दिलेली मुक्तमाला अझून तुझ्या कंठांत आहेना! अगे निर्दये एकावलि!

साकी.

माझी ह्मणवुनि, मदर्थ दयिता रक्षियलें नच कां गे ॥
रसिक वरातें हरुनी रडशी कां मजपाशिं तूं मागें ॥
मी येई तों ही ॥ रक्षियला त्वां प्रिय नाहीं! ॥१॥

कादं० —सखे किती मी मंदभाग्या! कीं सखीचें दुःख पाहणें माझ्या दैवीं आलें! (रडते)

महा० —सखे कादंबरि! —

श्लोक.

सखे आतां तूंचि प्रियसखिस जाळूनि सुख दे ॥
अभाग्या मी कैसें मरण न मला दुष्ट यम दे ॥
त्वरें हाणी आतां खरशर अशा वज्रहृदयीं ॥
कशाला ही आतां विफल तनु या दुःख समयीं ॥१॥

कादं० —सखे शांत हो! पूर्वी तुझ्याप्रमाणें हजारो स्त्रिया दुःखांत पडल्या! परंतु त्यानीं धैर्य धरून प्राण रक्षण केले! तुला जरी महा संकट

प्राप्त झालें आहे! तरी अझूनही मला वाटतें कीं तुझा प्राणपति तुला भेटेल!

महा० –हायहाय! येवढें माझें भाग्य कोठचें! ह्या गोष्टी मृगजल-वत् आहेत! सखे आतां माझ्यावर शेवटची कृपा येवढीच कर कीं काष्टें आणून चिता तयार कर! माझ्या जीवितेश्वरामागून मला लौकर गेलें पाहिजे!

(पडद्यांत) चमत्कार! हा काय चमत्कार!

साकी.

चंद्रमंडळापासुनि निघुनी दिव्य पुरुष हा आला! ॥
रत्नखचित हा किरीट शोभे तैशी मुक्तामाला ॥
याच्या तनु गंधें ॥ सखये सर्वहि वन कोंदे ॥१॥

(पडद्यांत शब्द होतो) महाश्वेते! तूं प्राण टाकूं नको, पुनः तुझा ह्याच्याशीं समागम होईल!

कादं० –हाय हाय! सखे तुझ्या प्रियाचें शरीर घेऊन हा उड्डाण करून निघून गेला! व त्याच्या पाठीस लागून कपिंजलही गेला! ही पहा याची वाणी अझून ऐकूं येत आहे! तो ह्मणतोः—

साकी.

दुष्टा मदना काळा माझ्यां मित्रा कोठें नेशी ॥
कोपें जाळुनि भस्म करिन मी देउनियां शापासीं ॥
सोडी त्या सखया ॥ नाहीं कैशी तुज माया ॥१॥

महा० –माझें हृदय तर द्विगुणित शोकानें विदीर्ण झालें! सखे! आतां म्यां काय करावें? माझ्या नेत्रांस आनंद देणारें शरीर देखील त्या दुरात्म्यानें नेलें!

कादं०–सखे तो दिव्य पुरुष होता! तो तुला अश्वासन देऊन गेला! कपिंजल ही गेला आहे!

महा०– आतां प्राण ठेवण्यांत काय अर्थ आहे!

साकी.

गेला प्रिय तो, मित्रहि त्याचा गेला त्याच्या मागें ॥
आतां त्याचें दर्शन घेइन आर्ये प्राणत्यागें ॥
देई तूं आज्ञा ॥ भेटाया मज त्या प्राज्ञा ॥१॥

कादं०—सखे महाश्वेते! प्राणपरित्याग सुलभ व हातचा आहे! कपिंजल जिवंत असून तो तुझ्या प्रियाचें वर्तमान घेऊन त्या महापुरुषाच्या अश्वासनाचा उलगडा करून लौकरच येईल! तर निदान तो येई तोंपर्यंत तरी प्राण धारण कर!

महा०—तुझ्या इच्छेप्रमाणें आजची ही भयंकर कालरात्री येथेंच घालवितें! आतां माझ्या जीवास आधार कायतें प्रियाचें मुनिव्रत!

कादं०—छेछे! असा दुर्धर तपोनियम धरूं नको. त्या महापुरुषाच्या वचनाप्रमाणें सर्व ठीक होईल. विश्वास मात्र असूंदे!

महा०—सखे कादंबरि! हा पहा प्रभातकाल समीप आला!

श्लोक.

शोकेंचि धूसर असा बघ चंद्र गेला ॥
लाजोनि मेघपटलीं रवि हा दडाला ॥
आकाश मेघमय आजि उदास झालें ॥
हें खिन्न विश्व करुणाब्धिंत हो बुडालें ॥१॥

तर मी या सरोवरामध्यें स्नान करून प्रियास अतिप्रिय जें वैराग्य, त्याचें अवलंबन करून, त्रैलोक्यनाथ सदाशिव, यास शरण जातें! हीं पहा! आयतींच योगसाधनें सन्निध आहेत! हा पहा प्रियाचा कमंडलू! हीं वल्कलें! व ही अक्षमाला!

कादं०—हायहाय काय कष्ट हे!

महा०—सखे आतां सर्व संसार निःसार वाटतो! मीं या शिवालयांत जातें! तूंही हेमकूट पर्वतीं जा!

(गर्भ नाटकांतील सर्व पात्रें जातात.)

शुद्रक—संपलें नाटक! कायहो विलक्षण कथानक ह!

श्लोक.

वाटे कथानक कुठें तरि आयकीलें ॥
या नाटकें हृदय फाराचि खिन्न केलें ॥
मातें अहो! परम दुर्धर दुःख झालें ॥
नेत्रांसि अश्रु करुणार्णवजन्य आले! ॥१॥

वेत्रधर – इकडून यावें महाराजांनीं!

क्षुद्रक –

पद.

(साध्य नसे मुनिकन्या.)

कोण असे ती धन्या ॥ आठवितों परि स्मरण न होई ॥
कोण असे०॥ धृ०॥
लावण्याची अभिनव खाणी ॥
नकळे कधिं नें हृदय हरोनी ॥
व्यर्थचि हुर हुर पाही ॥ वाटे मजला शून्य मही ही ॥
कोण असे० ॥१॥

(सर्व जातात.)

अंक पांचवा.

(वेत्रधर येतो.)

वेत्रधर—कायहो चमत्कार! हें नाटक पाहिल्यापासून महाराजांचा संताप अधीक वाढला!

श्लोक.

वाळा, चंदन, रम्य कोमलदलें, मोत्यें, मृणालें, फुलें! ॥
शय्यायुक्तशिलातलें, रुचिरशीं हीं कर्दलीचीं दलें! ॥
नानापल्लव! तालवृंत! अवघीं द्रव्यें वृथा जाहलीं! ॥
वारा व्यर्थ! तशीं वृथैव करिती धारागृहें काहली! ॥१॥

राजधानींत राहून करमेना, ह्मणून महाराजांनीं मला आज्ञा केली कीं, अरे वेत्रधरा, या विदिशानगरीपासून चार योजनें एक मोठें वन आहे, तेथें जाऊन मृगया करावी, अशी मला इच्छा झाली आहे. तर सर्व पारधी बरोबर घेऊन तूं वेतस्वती नदीच्यातीरीं माझी मार्गप्रतिक्षा कर. आज्ञेप्रमाणें मी येथें आलों आहें! हा पहा रमणीय प्रभात समय!

पद.

(जल भरन जात.)

संध्या रागें प्रभात कालीं अरुण अरुणसें नभ हें झालें ॥धृ०॥
कमलस्था वृद्धा हंसापरि अरुण चंद्र हा अस्ता चाले ॥
वृद्ध श्वेत मृगाच्या केशापरि दिङ्मंडल शुभ्रचि झालें ॥
दूरवरी हे लांब लांब कर बालरवीचे पसरुनि गेले ॥
माणिक्याचे जणों खराटे टाकिति भगणें झाडुनि खाले ॥१॥

आणखी—

श्लोक.

भूभागीं दंववृष्टि होय कुसुमें खालीं गळों लागलीं! ॥
जाणों हे मुनि! वन्यवृक्ष! रवितें देती सुपुष्पांजलि ॥

वारा मंद सुगंधि शीतल असा वाहे! पशूंचीं कुळें ॥
झालीं जागृत! विश्व हें पुनरपि स्नेहें जणों जन्मलें ॥१॥

आणखी—

फाडोनी जणु अंधकारपडदा प्राणप्रिया पद्मिनी- ॥
झाली खिन्नचि जी निशीथ समयीं देखावया ती झणी ॥
येवोनी उदयाचलावरि रवि प्राणेश्वरीतें करीं ॥
आनंदें कुरवाळुनी त्रिभुवनीं धन्या दयेनें करी ॥२॥

अहाहा! काय या वसंतऋतूची अभिनव शोभा!

कटाव.

किसलय, कोमल लतापल्लवां नाचविणारा; कामाग्नीला पेटविणारा! दक्षिणवायु पुढें धाडिला, कोमलपल्लव रक्त जयाचे; अशोक ऐसे चंचल झाले, जिकडे तिकडे आम्रतरू हे प्रफुल्ल झाले, नाना परिचीं फुलझाडें ही प्रफुल्ल झालीं! परिमळ ज्यांचा वनीं सूटला, पलाश फुलुनी रक्त जहाला, अनुरागानें जणुं तो भरला! कामिजनांचा मानचि हरला! लज्जेचा तों अंतचि झाला! प्रणयकोप तो नष्ट जहाला! विलासिनींचा गर्वचि गेला! मकरध्वज तो पलाश रूपें वनीं फडकला, तरुपल्लव ते नम्र जहाले! प्रेमाचि अवध्या विश्वीं भरलें! उत्साहें मन प्रसन्न झालें, मधुमद लोभें कोकिळ आले, सुस्वर गानें करिते झाले, जिकडे तिकडे मकरंदानें वन हें भरलें, मधु प्रसंगें मधुकर माला, प्रमत्त होउनि मधुर मधुरसा गुंजारव ती करिती झाली! ॥ ऐसा हा वसंत आला ॥ सुखकर जो कामिजनाला! ॥१॥

(पाहून) काय! महाराज आले! तर आतां मी एकीकडे उभा राहतों.

(शुद्रकराजा येतो.)

शुद्रक—

पद.

(साध्य नसे मुनिकन्या.)

कोण असे ती धन्या ॥ आठवितों परि स्मरण न होई ॥
कोण असे ती धन्या ॥ धृ०॥

लावण्याची अभिनव खाणी ॥
नकळे कधिं ने हृदय हरोनी ॥
व्यर्थचि हुर हुर पाही ॥ वाटे मजला शून्य मही ही ॥
कोण असे ती धन्या ॥१॥

वेत्रधर—जयजयकार महाराज! आज्ञेप्रमाणें सर्व पारधी रान वेढून बसले आहेत! याउपर जशी महाराजांची मर्जी!

शुद्रक—वेत्रधरा! अरे हें तपोवन पाहिलें नाहींस काय? येथें मृगया करणें तापसजनांस संतापकारक होईल! पहा!

श्लोक.

वातें अहा तरु लता बघ नम्र होती ॥
जाणों समस्त मुनिंचे पद वंदिताती ॥
हा होमधूम गगनाप्रति जात आहे ॥
सोपान नाकभुवनीं जणुं हाच पाहे ॥१॥

आणखी—

नाना पुष्करणींत आश्रम पदीं पुण्यें जणों सांचलीं ॥
ऐशा गोड विशुद्ध निर्मल जलीं पद्में पहा शोभलीं ॥
सावे आमसुलें लवंग बदरी हीं अंगणीं वाळती ॥
आनंदें मुनिचीं कुलें बटु सवें वेदाक्षरें घोकिती ॥१॥

आणखी—

अंजनी गीत.

निःसंशयहीं हरिणें चरती ॥ विश्वासें मुनितनयां हुंगिति ॥
राजहंसही धान्य वेंचिती ॥ तपोवनीं पाहे ॥१॥
अंध वृद्ध मुनि करीं धरुनियां ॥ घेउनि जाती कपि हे पाहा ॥
वन्यकरी, उद्यान लता या ॥ शिंचिति वात्सल्यें ॥२॥
थै थै नाचत नाचत येती ॥ रम्य पिसारा पहा पसरिती ॥
अग्नि-वेदिला वायु घालिती ॥ मयूर या स्थानीं ॥३॥

असें हें अत्यंत रमणीय तपोवन कोणास आनंद देणार नाहीं! तर मृगयेचा विचार सोडून द्यावा!

वेत्रधर—जशी महाराजांची आज्ञा!

(पडद्यांत गलबला होतो.)

शुद्रक—वेत्रधरा हे पारधी तापसजनांच्या नित्यकर्मांत विघ्न करीत आहेत काय?

वेत्रधर—महाराज हा पारधी आला!

(पारधी येतो.)

पारधी—जयजयकार महाराज! रानवेढण्यास जाळीं लाविलीं असतां हा अपूर्व शुक त्यांत सांपडला! तो महाराजांच्या चरणीं सादर करण्याकरितां आणिला आहे!

शुद्रक—आण आण! (घेतांच दोघे अदृश्य होतात. पडदा पडतो)

वेत्रधर—(भयानें) अरेरे आमचे महाराज एकाएकीं कोठें गेले? (पारध्यास) हें रे काय?

पारधी—अरेरे! हें काय झालें! चला चला शोध करूं चला.

(सर्व जातात.)

(पडद्यांत गायन चालतें.)

पद. (जल भरन.)

उत्कंठित मन होय वसंतीं श्वासोश्वासा शक्ति न उरली ॥धृ०॥
सर्वहि तनु मम घर्मे भिजली रोमांचानें फुलुनी गेली ॥
अधर थरथरे कंपवरी तनू वरि वरि होई आजि कहाली ॥
प्राणविसाव्या निष्ठुरमति कां दासीवरि या अझुनी केली ॥
उत्कंठित मन होय० ॥१॥

(नंतर चंद्र, पुंडरीक, कादंबरी, महाश्वेता व कपिंजल हीं येतात.)

चंद्र—सखे कादंबरि!—

साकी.

शंका सोडी चंद्रापीडचि नाथ तुझा हा पाहे ॥
अमृतस्त्रावी तुझिया स्पर्शे आर्ये जीवन लाहे ॥
आतां कां भीसी ॥ दे दे कोमल हस्तासी ॥१॥

महा०—सखे कादंबरि!

दिंडी.

आजि सुख हें चालोनि घरा आलें ॥
जगीं तूतें तेणोंचि धन्य केलें ॥
बंधु माझा भेटला तुझ्या दैवें ॥
भेट त्यातें सुंदरी प्रमभावें ॥१॥

पुंडरीक—केवढा! आनंदाचा दिवस!

चंद्र—आर्ये महाश्वेते!

पद. (श्री हरिच्या वेणु नादें)

विरहाचें दुःख भारी तुज आर्ये जाहलें ॥
शापुनिया नाथ तूझा तुज दुःखीं घातलें ॥
अपराध प्रेमभावें विसरे तूं वत्सले ॥
आनंदें दृष्टि देई प्रिय वदनीं प्रेमळे ॥ विरहाचें० ॥१॥

कपिंजल—

श्लोक.

अहो! आशापाशें श्रमुनि भगिनी जीव धरिती ॥
महाकष्टानें या रडुनि हृदयें खिन्न करिती ॥
निराशेनें झाल्या विकळ! परि ती प्रेमलहरी ॥
उठे! आनंदाचे ह्मणुनि दिसले प्रेमळ गिरी ॥२॥

चंद्र—सख्या पुंडरीका! तुझ्या शापामुळें मला जरी दोन वेळ जन्मास यावें लागलें, तरी या माझ्या अवतारचरित्राच्या योगानें देवी कादंबरीचें रमणीय दर्शन झालें! हे तुझे उपकार आहेत! मी मात्र तुला शाप देऊन कुलभूषणा महाश्वेतेस दीर्घ विरहदुःख दिलें!

पुंड०—हे भुवनभूषण! रोहिणीपते! तारारमण! कादंबरीनयनानंद चंद्र!

साकी.

परम दुरात्मा अविनय करुनी स्वयें संकटीं पडला ॥
निज पापाचे झाडे द्याया लावी आर्या तुजला ॥
तो हा मी पापी ॥ मानचि दयितेची कापी ॥१॥

अशा मला देव मित्र ह्मणतात! केवढा हा आपला थोरपणा!

चंद्र—असो! आतां गत गोष्टीचा शोक करून उपयोग नाहीं!

दिंडी.

दैवयोगें संपोनि शाप आतां ॥
सुखी झाली सुंदरी महाश्वेता ॥
यांत आहे आनंद मला भारी ॥
सखी तीची बहु मजसि मोदकारी ॥१॥

सख्या! मी चंद्र तोच चंद्रापिड! व चंद्रापीड तोच शुद्रक! आणि तूं पुंडरीक तोच वैशंपायन!

साकी.

जन्मों जन्मीं झालों आपण मित्र शुद्धभावानें ॥
आतां आनंदें नांदुनियां करूं जनहिता जाणे ॥
परोपकाराचें ॥ आनंदप्रद फल साचें ॥१॥

पुंड०—जशी देवाची आज्ञा!

चंद्र—सखे कादंबरि! पाहिलीसना ही वनराजी!

पद. (उद्धवा शांतवन.)

अभिनव ही बघ वनराजी ॥ आनंदवि मज दे आजी ॥
चौभागीं भव्य अरण्यें ॥ भरलीं जीं तरुपंक्तीनें ॥
फुलझाडें भरलीं येथें ॥ पसरे वनिं परिमळ जेणें ॥
उत्फुल्ल आम्रवन झालें ॥ नादित, पिक मंजुरवानें ॥
हिंताल, ताल, लवलीही ॥
नारिकेल लोध्र तरु पाही ॥
मिर लवंग बकुल वनेंहीं ॥
शोभति किसलय योगें जीं ॥ अभिनव ही बघ० ॥१॥

आणखी—

श्लोक.

झोपाळे वनदेविचे तरुचिया शाखांवरी लोंबती ॥
नाना रम्य लतागृहें चहुंकडे पुष्पोद्गमें शोभती ॥
वेष्टोनी गिरिचे नितंब सरिता झाडींतुनी वाहती ॥
जेथें श्वापद घोर शब्द करुनी एणास भी दाविती ॥१॥

कादं०—खरेंच काय रमणीय प्रदेश!

श्लोक.

कोठें रम्य तपोवनीं निबिडशी झाडी! कुठें गोपुरें ॥
कोठें दीर्घ सरोवरें विलसती कोठें गिरींचीं शिरें ॥
कोठें दूरवरी सुरम्य सरिता वेगें पहा धांवती ॥
कोठें थोर अगण्य सिंधुवरि या लाटा जवें ऊठती ॥१॥

चंद्र—

श्लोक.

जिच्या नादें होती मधुर रव ते व्यर्थ सगळे ॥
सुधा पात्रें जाणों सुखचि मम कर्णांत भरलें ॥
अहा! आनंदानें उठति हृदयीं प्रेमलहरी ॥
अशी वाणी आली कुठुनि सुखदा जी मन हरी ॥१॥

कपिं०—सख्या पुंडरीका!

श्लोक.

झालें प्रसन्न जग हें रविच्या प्रभेनें ॥
उद्यान भाग दिसती रमणीय तेणें ॥
क्रीडास्थळें, उपवनें जलमंदिरें हीं ॥
हे कुंज होत जणुं कांचनलिप्त पाही ॥१॥

पुंड०— गमनमार्गक्रमानें आपण हेमकूट पर्वताच्या रमणीय प्रदेशांत आलों!

साकी.

प्राची पश्चिम सिंधुत ज्याचीं बुडुनी शिखरें गेलीं! ॥
कांति जयाचि संध्याप्रभापरि सोज्वळ या कालीं ॥
श्रृंगें सोन्याचीं ॥ दुरुनी चमकति हो ज्याचीं ॥१॥

महा०—काय हेमकूट पर्वताची शोभा!

श्लोक.

क्रीडा पर्वत हा! सुवर्ण शिखरें! उत्तुंग हीं मंदिरें ॥
नाना कल्पलता निकुंज धवलें क्रीडांगणें गोपुरें ॥

उद्यानें मकरंदगंध सुखदें धारागृहें शीतलें! ॥
कैलासासम रम्य हें स्थळ इथें मच्चित्त हो गुंगलें ॥१॥

पुंड०—ह्मणूनच माझा अंतरात्मा या स्थळीं प्रसन्न होतो!

चंद्र०—पहा आपण उतरत असतां सर्व जग कसें रमणीय दिसतें!

श्लोक.

पुरें झाडें जेथें लघु लघुचि सर्वत्र दिसलीं ॥
नगांची जी माला कुवलय गले रम्य गमली ॥
विभूतीच्या रेखापरिच गमल्या शुभ्र सरिता ॥
गमे एकाएकीं भुवन परि हें भव्य बघतां! ॥१॥

पुंड०—खरोखर ही अपूर्व विश्वरचना आज फारच रमणीय दिसते! त्यांतून हा वसंतसमय फारच शोभा देतो!

श्लोक.

पुष्पांनीं कचभार सज्ज करुनी माळा गळां घालुनी ॥
अंगीं लाउनि अंगराग कुसुमें कर्णस्थळीं ठेवुनी ॥
आनंदेंचि अनंगपूजन करूं येती वनाभ्यंतरीं ॥
होती व्याकुळ पंचबाण शिरतां देहीं पहा सुंदरी ॥१॥

कपिं०—असो! आपण हेमकूट पर्वतावर आलों! भगवति! महाश्वेते तुझ्या निस्सीम भक्तिभावानें व तपःसामर्थ्यानें आज हा सोन्याचा दिवस उगवला!

श्लोक.

तूतें तुझा दयित सुंदरि आज लाहे ॥
माझा सखा मजसि भेटविलास पाहे ॥
लक्ष्मीस तूं तनय आणुनि भेटवीला ॥
पुण्यें तुझीं सुखद जाहलिं हीं सखीला ॥१॥

महा०—(लाजते)

पुंड०—(महाश्वेतेस)

साकी.

पुरे पुरे हा विनय सखे तुज कष्ट जहाले भारी ॥
धरितो हा जन मंगल सुखकर कोमल कर संसारीं ॥
साक्षी गे यातें ॥ पुण्यप्रद पांचही भूतें ॥१॥

चंद्र—केवढा आनंदाचा दिवस हा!

कपिं०—मुलीनों! तुह्मी सूज्ञ आहां! तुमचा अनुराग तुमच्या प्रेमळ हृदयांत वास करीत आहे! परंतु ही वत्सलता तुह्मांस उपदेशपर दोन शब्द सांगत आहे!

श्लोक.

जेवीं होइल रंजन स्वपतिचें धन्याकृति ती अशी ॥
कांतेचें मुख सुप्रसन्न! पतिच्या आनंद दे मानसीं ॥
धैर्यानें, विनयें, विनीत वचनें शोभे दयेनें सती ॥
होतां रुष्ट पति, प्रिया मृदुवचें त्याच्या मना तर्पिती ॥१॥

कादं०—भगवन् कपिंजल! या सर्व मंडळींत तेवढी पत्रलेखा नाहीं!

चंद्र—ती रोहिणी माझ्या लोकीं आहे! आपण चंद्रलोकीं गेलों, ह्मणजे ती तुला भेटेल!

कपिं०—बरें! मित्रानों चला आपण गंधर्वपुरींत जाऊन सर्वांस हें आनंददायक वर्तमान कळवूं. आणखी तुमचें प्रिय काय असावें?

चंद्र—याहून आणखी प्रिय करावयाचें उरलें आहे काय? तथापि, आपण ह्मणतां त्या पक्षीं असें असो.

श्लोक.

दुःखें न होउत कधीं प्रणयी जनांतें ॥
लाधो सदैव सुखसंगम सज्जनांतें ॥
रम्या कथा सुमधुरा विबुधप्रिया ही ॥
प्रेमें वरो रसिक शंकर[1] नित्य पाही ॥१॥

(पडदा पडतो.)

---

१ परमेश्वर (पक्षी) कवीचा मित्र शंकर गणेश देशपांडे बी. ए. एल. एल. बी.

कादंबरी नाटक समाप्त.